# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १८५ वा ❑ भारतीय सौर दिनांक १५ भाद्र. शके १९४८, रविवार दि.०६ सप्टेंबर २०२६ ❑ पाने ८ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### पंतप्रधान मोदींकडून पुरस्कार विजेत्या शिक्षकांचा दिल्लीत सन्मान

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

शिक्षक दिन हा केवळ एक उत्सव नसून, ती एक अशी संधी असते जेव्हा राष्ट्र उभारणीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या गुरूप्रती कृतज्ञता व्यक्त करतात. याच औचित्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेत्या देशभरातील निवडक आणि उत्कृष्ट शिक्षकांशी एक अतिशय खास, सविस्तर आणि मनमोकळा संवाद साधला. देशाच्या राजधानीत पार पडलेला हा कार्यक्रम केवळ एक औपचारिक सत्कार समारंभ नव्हता, तर तळागाळातील वास्तवाशी थेट नाळ जोडलेला एक वैचारिक स्नेहमेळावा होता. या संवादाच्या माध्यमातून देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाने शिक्षकांच्या कष्टांची, त्यांच्या त्यागाची आणि त्यांनी शिक्षण क्षेत्रात आणलेल्या नाविन्यपूर्ण बदलांची अत्यंत आत्मीयतेने दखल घेतली.

शिक्षक दिन हा समाज आणि राष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा एक अत्यंत महत्त्वाचा दिवस असतो. यंदा ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून नवी दिल्ली येथे एका भव्य आणि प्रेरणादायी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष प्रसंगी देशभरातील एकूण ८२ उत्कृष्ट शिक्षक, प्राध्यापक आणि प्रशिक्षकांना त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील असामान्य योगदानासाठी राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये शालेय शिक्षण विभागातील ४८, उच्च शिक्षण आणि तंत्रनिकेतनमधील २१, तर कौशल्य विकास मंत्रालयातील १३ प्रशिक्षकांचा समावेश होता. या सोहळ्याचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे, पुरस्कार वितरणानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या सर्व विजेत्या शिक्षकांशी अत्यंत मनमोकळेपणाने साधलेला खास संवाद. हा केवळ एक सत्कार समारंभ नव्हता, तर तळागाळातील वास्तवाशी थेट नाळ जोडलेला आणि देशाच्या भविष्यावर मंथन करणारा एक वैचारिक स्नेहमेळावा होता.

या राष्ट्रीय स्तरावरील गौरवात महाराष्ट्रानेही आपली ठसठशीत मोहर उमटवली. यावर्षी राज्यातील चार अत्यंत ध्येयवेड्या शिक्षकांना या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, ज्यांचे कार्य खऱ्या अर्थाने दिशादर्शक आहे. बीड जिल्ह्यातील केज येथील साने गुरुजी निवासी विद्यालयात कार्यरत असलेल्या कविता गिट्टे यांनी ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांचे बालविवाह रोखण्यासाठी घेतलेली मेहनत वाखाणण्याजोगी आहे. नाशिकच्या आनंदवल्ली शाळेतील शिक्षिका कुंदा बच्छाव यांनी लोकसहभागातून मोठा निधी उभा करत वंचित विद्यार्थ्यांसाठी रोबोटिक्स आणि थ्रीडी प्रिंटिंगची प्रयोगशाळा उभारली, तसेच गावातील भिंतींना ज्ञानाच्या भिंती बनवले. लातूरच्या पीएमश्री जवाहर नवोदय विद्यालयातील वैभव कुलकर्णी यांनी आपल्या नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतीतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला, तर सातारा येथील सैनिकी शाळेत कार्यरत असणाऱ्या शिवप्रसाद टिंगरे यांनी शालेय गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध व्यक्तिमत्त्व विकासात मोलाचे योगदान दिले. पंतप्रधानांनी या सर्व शिक्षकांनी राबवलेल्या नाविन्यपूर्ण प्रयोगांचे आणि त्यांच्या निस्वार्थ सेवेचे विशेष कौतुक केले.

पंतप्रधान मोदी यांनी या संवादादरम्यान सर्व पुरस्कार विजेत्या शिक्षकांचे अनुभव अत्यंत आत्मीयतेने जाणून घेतले. विशेषतः ग्रामीण, आदिवासी आणि दुर्गम भागांमध्ये जिद्दीने ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या शिक्षकांच्या समर्पणाला त्यांनी सलाम केला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या यशस्वी अंमलबजावणीमध्ये शिक्षकांची भूमिका सर्वात महत्त्वाची असल्याचे पंतप्रधानांनी स्पष्ट केले. मातृभाषेतून शिक्षण आणि केवळ पुस्तकी ज्ञानाऐवजी रोजगारक्षम कौशल्य विकासावर त्यांनी भर दिला. आजच्या डिजिटल युगात, जिथे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सोशल मीडियाचा प्रभाव वाढत आहे, तिथे तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करून विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखवणारे शिक्षकच खऱ्या अर्थाने २०४७ च्या विकसित भारताचे शिल्पकार आहेत, असा विश्वास मोदींनी व्यक्त केला.

देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाने एका सामान्य शिक्षकाच्या पाठीवर मारलेली ही कौतुकाची थाप संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा आत्मविश्वास वाढवणारी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेते शिक्षक यांच्यातील हा संवाद केवळ त्या मोजक्या ८२ शिक्षकांसाठीच नाही, तर देशभरातील लाखो शिक्षकांसाठी एक मोठी ऊर्जा देणारा ठरला आहे. नवभारताच्या निर्मितीमध्ये शिक्षकांचे स्थान नेहमीच सर्वोच्च राहील, हाच स्पष्ट आणि प्रेरणादायी संदेश या ऐतिहासिक सोहळ्यातून संपूर्ण देशाला मिळाला आहे.

# नृत्य-नाट्य-संगीते, सकल ब्रम्हांड डोलते !

## शिक्षक दिनानिमित्त रंगदृष्टी कार्यक्रमात अनुभूती





ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - शिक्षक दिनाचे औचित्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रदर्शिक कला विभागात रंगदृष्टी या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासोबतच त्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन तसेच विद्यार्थ्यांना कलात्मक अभिव्यक्तीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला असल्याचे विभागप्रमुख प्रा. डॉ. वैशाली बोदेले यांनी सांगितले.

विद्यापीठाच्या परीक्षा नियंत्रक व मूल्यमापन विभागाचे प्रमुख डॉ. बाबासाहेब डोळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. आपल्या मनोगतात डॉ. डोळे यांनी विद्यार्थ्यांना ज्ञान, कला, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालून सर्जनशीलतेचा विकास करण्याचा हितोपदेश केला. फिजिक्स आणि ड्रामा यांचा संबंध जवळचा आहे. कला आत्मसात करताना विद्यार्थ्यांनी तन-मन-धनाने ज्ञानग्रहण केले पाहिजे. कलित कला, साहित्य, विज्ञान, तत्त्वज्ञान आणि तंत्रज्ञान यांची सांगड घातली पाहिजे. विद्यार्थ्यांनी शास्त्रातून शास्त्र शिकत असतानाच अंत:करणातून रंग आणि कलाविष्कार व्यक्त करण्याची क्षमता विकसित करावी, असे डोळे म्हणाले.

प्रा. डॉ. स्मिता साबळे यांनी शिक्षक कसा असावा, याचे उदाहरण देताना प्रा. डॉ. रुस्तुम अचलखांब, शशिकांत बऱ्हाणपूरकर, डॉ. कुमार देशमुख, सीने अभिनेत्री गीता अग्रवाल यांचा उल्लेख केला. या शिक्षकांसारखी सर्जनशिलता विद्यार्थ्यांनी आत्मसात करावी, असा सल्ला साबळे यांनी दिला. विभागप्रमुख प्रा. डॉ. वैशाली बोदेले यांनी अध्यक्षीय समारोप केला.

याप्रसंगी डॉ. गजानन दांडगे, डॉ. विशाखा शिरवाडकर, डॉ. संजय सांगवीकर, डॉ. गणेश शिंदे, प्रा. प्रदीप कांबळे, प्रा. रमेश धोंडगे, प्रा. सचिन शिंदे, प्रा. मुरलीधर भुताळे, प्रा. सुनील कांबळे, प्रा. योगेश गचे आदींसह विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

नृत्य, नाट्य आणि संगीताने सजलेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध कलाविष्कारांचे सादरीकरण करत विद्यार्थ्यांनी शिक्षक दिन अपूर्व उत्साहात साजरा केला. नव्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे सादरीकरण करत वातावरण भारावून टाकले. एकूणच कलाविष्कार, मनोरंजन आणि सर्जनशीलतेचा सुंदर मिलाफ या कार्यक्रमातून अनुभवण्यास मिळाला.

रंगदृष्टीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कला सादरीकरणासोबतच नवनिर्मिती, प्रयोगशीलता आणि आत्मविश्वासाला चालना देणारे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा यानिमित्ताने प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या कलात्मक जडणघडणीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत विभाग प्रमुख डॉ. वैशाली बोदेले यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन बसवराज टाकळे यांनी, तर डॉ. गजानन दांडगे यांनी आभारप्रदर्शन केले.

## मोठ्या आवाजाचे धर्म...

ज्योतिर्मय साहित्य



आज आपण ५१व्या शतकात शांततेने जगत आहोत. पण २१व्या शतकात आजच्यासारखी शांतता नव्हती. त्या काळाला आधुनिक काळ म्हणत असत. एकविसावे शतक असूनही त्या काळातले लोक चौदाव्या शतकात असल्यासारखे वागत.

प्रचंड गोंगाट आवडणारे आणि कानठळ्या बसवणारे लोक होते ते. आपलेच पूर्वज होते; पण मोठे कट्टर होते. धर्म नावाचे अनेक प्रकार त्या काळी होते. त्या सर्वांना मोठ्या आवाजाचे धर्म असे आपण म्हणू शकतो. बहुसंख्य लोक मोठ्या आवाजाचा धर्म पाळत असत. त्या प्रत्येकाला आपलाच धर्म खरा वाटत असे. धर्म व परंपरेच्या नावाखाली ते लोक अतिशय भयंकर आवाजात गाणी वाजवत आणि फटाके नावाच्या विषारी पुंगळ्या फोडत. त्या आवाजाचा, धुराचा सर्वांना त्रास होत असूनही ते असे करत. कारण ते सर्व धर्म मोठ्या आवाजाचे धर्म होते. पूजा, प्रार्थना वगैरे दुय्यम दर्जाच्या गोष्टी होत्या. मोठा आवाज हाच त्यांचा मुख्य धर्म होता.




कमी आवाजाचा धर्म क्वचित एखादाच होता. मोठा आवाज म्हणजेच धर्माचे पालन करणे, असे त्यांना वाटे.

कालांतराने त्यातल्या काही शहाण्या लोकांनी इतरांना जागे करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा सर्वांनी मिळून अशा लोकांना छळले, तर काहींना मारले. तरीही काही लोक मोठ्या आवाजाचा धर्म पाळू नका असे सांगत राहिले. हळूहळू अशा जागल्यांची संख्या वाढत गेली. त्यांना धार्मिक लोक छळत राहिले.


नंतर मात्र अजब प्रकार घडला. मोठ्या आवाजाचा धर्म इमानदारीने पाळणारे लोकही मोठ्या आवाजाने मरू लागले. डायनोसोरप्रमाणे ते मनुष्यप्राणी निसर्गाला नष्ट करायचे होते. तरीही ते लोक मोठ्या आवाजाचा धर्म सोडायला तयार नव्हते. ते दर सणाला मोठा दणदणाट करत राहिले. आवाजाच्या धक्क्याने मरत राहिले. हळूहळू त्यांची संख्या कमी होत गेली.

शेवटी आज ५१व्या शतकात त्यातले अगदी मोजके लोक उरले आहेत. मात्र त्यांचे मतदान कमी असल्यामुळे त्यांना कुठेही आवाज उठवता येत नाही. अशा रीतीने देशात शांतता नांदू लागली...


## ध्वनी व प्रदूषण विरहित तसेच लेझर शो विरहित गणेशोत्सव साजरा व्हावा


ज्योतिर्मय साहित्य

येणारा गणेशोत्सव हा पुणे पाठोपाठ नागपूरनेही ध्वनी विरहित, लेझर शो विरहित व प्रदूषण विरहित श्री गणेशोत्सव साजरा व्हावा अशी मागणी केलेली आहे. डीजेच्या कानठळ्या बसविणाऱ्या आवाजाने अनेकांचे कानाचे पडदे फाटून ते बहिरे झालेले आहे. अनेकांना हृदयाचे आजार उद्भऊन ते मृत्यू मुखी ही पडलेले आहेत, किंवा हृदय रोगा सोबत जगत आहेत. ''लेझरच्या घातक प्रकाश झोताने डोळ्यांचे पापुद्रे, (दृष्टी पटल) निकामी होऊन ते आंधळे म्हणून जीवन जगत आहेत. श्री गणेशोत्सव काळात गणेश भक्त स्वच्छता ठेऊ असे वचन देतात मात्र अगदी पहिल्या दिवसापासून कोणीही स्वच्छता पाळत नाहीत, या शिवाय खिरापत कित्येक तास उघडी पडलेली असते, त्यावर कीटक, माशा बसतात व तोच प्रसाद म्हणून दुसऱ्या दिवशी किंवा सायंकाळी प्रसाद म्हणून वाटला जातो. या सर्व बाबी अत्यंत घातक व मारक आहे. श्री गणेशोत्सव हा सांस्कृतिक, नैतिक, आदरयुक्त, मानवी मूल्ये, नीतिमत्ता पाळणारा उत्सव आहे. यांचा विचार करता युवा पिढीने वरील बाबींवर विचार करून सर्व प्रकारच्या प्रदूषण पासून मुक्त असा श्री गणेशोत्सव या वर्षी साजरा करून पहावा असे वाटते.









# जात्यावरच्या ओव्या......

अरे बरस पावसा
करते विनवणी
तुही अशी मनमानी
माझा जीव टांगणी ||८३२||

अरे बरस पावसा
तु झालास जुलमी
तुही कराया फिर्याद
जाऊ कोणत्या ठेसनी ||८३३||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७१

ज्योतिर्मय साहित्य

समर्थ तिसऱ्या ओळीत म्हणतात की नामाच्या योगाने पुण्यठेवा घडतो म्हणजे वाढतो. बँकेतील आपल्या खात्यात आपण बचत म्हणून थोडे थोडे पैसे टाकत राहतो. यात सातत्य असले तर ही पुंजी वाढत जाते. मुद्दलावरही व्याजही लागू होते. रामनाम ही तर अत्यंत मौल्यवान ठेव ! थोडीथोडी जमा करत गेलो की पुण्यसंचय वाढत जातो. संत मीराबाई म्हणतात,'' पायो जी मैने रामरतन धन पायो...'' हे असं अमोलिक धन आहे की '' खर्च न खुटे, चोर न लुटे.'' इतर धन खर्चल्याने संपतं. पण याची महती काही वेगळीच. हे तर दिवसेंदिवस वाढतच जातं. विशेष म्हणजे हे धन असं आहे की याला चोरही लुटू शकत नाही. सातत्याने रामनाम घेणाऱ्याचा पुण्यसंचय वाढतच राहतो.

नामस्मरणाने वासनांचा क्षय होतो. म्हणजे भगवंत प्राप्तीखेरीज इतर वासना हळूहळू नष्ट व्हायला लागतात. शेवटी केवळ भगवंत प्राप्तीची इच्छा उरते. आपल्या पुण्यसंचयानुसार ती या जन्मी किंवा पुढील जन्मी भगवंत नक्की पूर्ण करतो. तेव्हा हे मना, प्रभात समयी श्रीरामाच्या रूपगुणांचे चिंतन कर. दिवसभरही त्याचे नित्य स्मरण ठेव. हे नाम तुला मोक्षाकडे घेऊन जाईल.





विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२



स्वसंवाद : १. मी रोज माझ्या बँक खात्यातील शिल्लक तपासतो, पण माझ्या खात्यात पुण्यठेवा किंवा रामनामाची पुंजी किती जमा होत आहे, याचा हिशेब ठेवतो का ?

२. ''शेवटचा दिस गोड व्हावा'' असे मला वाटते, तर मग शेवटच्या क्षणी ते नाम सहज मुखात यावे म्हणून मी आजपासूनच अंतःकरणाला तशी सवय लावत आहे का?

३. माझ्या हातून कळत-नकळत होणारे छोटे-मोठे दोष किंवा वाईट विचार दूर व्हावेत म्हणून मी नामस्मरणाचा आधार घेतो का?

४. मीराबाईंनी म्हटल्याप्रमाणे, मला हे अमोलिक धन मिळवण्याची खरी आस लागली आहे का की अजूनही चोरांनी लुटल्या जाणाऱ्या नश्वर धनामागेच धावत आहे ? (क्रमशः)





ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏

# || संजय उवाच... ||




@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ नशीब

प्रत्येकाचे नशीब हे त्याच्याच हातात असते, इथे आपोआप काहीच मिळत नसते, त्यामुळे कष्ट, प्रामाणिकपणा आणि बुद्धीच्या जोरावर आपणच आपले नशीब घडवायचे असते.. सर्वांच्या नशिबात चांगलेच असते फक्त ते शोधता आले पाहिजे.

# नाम-रूपाचा संबंध !



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नाम घेत असताना रूपाचे ध्यान आवश्यक आहे का ? वास्तविक, नाम आणि रूप ही भिन्न नाहीतच. पण नाम हे रूपाच्या आधीही असते आणि नंतरही उरते. नाम रूपाला व्यापून असते. राम जन्माला येण्यापूर्वी वाल्मीकींनी रामायण लिहिले, आणि रामाने मागाहून जन्म घेऊन त्यात वर्णन केल्याप्रमाणे आचरण करून दाखविले. म्हणजे रूप अस्तित्वात येण्यापूर्वी नाम होते, आणि रूप गेल्यानंतर आजही नाम शिल्लक आहे. देशकालाच्या पलीकडे जे कायम टिकते ते सत्य होय. प्रत्यक्ष आकाराला आलेली अनेक रूपे नाहीशी झाली तरी त्यांचे नाव टिकून राहते. म्हणजे नाम हे देशकालाच्या मर्यादेच्या पलीकडे असते; म्हणजे ते रूपापेक्षा जास्त सत्य असते. जे सत्य आहे ते श्रेष्ठ असलेच पाहिजे. तेव्हा नाम घेणे ही गोष्ट मुख्य आहे. ते घेत असताना रूपाचेही ध्यान राहिले तर उत्तमच; पण ते तसे न राहिले, तरी नाम घेत असताना रूपाचे स्मरण सूक्ष्मरूपाने असतेच असते. समजा, एका गृहस्थाच्या घरी राम नावाचा गडी आहे. तो गृहस्थ 'राम राम' असा जप करीत बसला आहे, पण त्याचे लक्ष राम-रूपाकडे नाही, मनात काहीतरी दुसरेच विचार चालू आहेत. अशा वेळी त्याला जर एकदम विचारले की, ' तुम्ही कुणाचे नाव घेत आहात ? ' तर अर्थात् 'रामाचे', असेच उत्तर तो देईल. हे उत्तर देताना त्याच्या मनात ' दाशरथी राम ' हीच व्यक्ती असणार, ' राम गडी ' ही व्यक्ती नसणार. याचाच अर्थ असा की, नाम घेत असताना रूपाचे ध्यान सूक्ष्मरूपाने आत जागृत असते. म्हणूनच, रूप ध्यानी येत नाही म्हणून अडून बसू नये.

नामस्मरण करण्याचा अट्टाहास ठेवावा, त्यात सर्व काही येते. एखाद्या माणसाची आणि आपली ओळख असेल तर पहिल्याने त्याचे रूप पुढे येते आणि नंतर नाम येते. पण आपली त्याची ओळख नसेल, आणि आपण त्याला बघितलेला नसेल, तर त्याचे फक्त नाव येते. आज आपल्याला भगवंताची ओळख नाही, म्हणून त्याचे रूप माहिती नाही; परंतु आपल्याला त्याचे नाम घेता येईल. सध्यासुद्धा, त्याचे नाम घेताना त्याची आठवण आपल्याला होते हा आपला अनुभव आहेच. भगवंताचे रूप तरी निश्चीत कुठे आहे ? एक राम ' काळा ' तर एक राम ' गोरा ' असतो; एक राम 'लहान' तर एक ' मोठा ' असतो; पण सर्व रूपे एका रामाचीच असतात. भगवंत स्वत: अरूप आहे; म्हणून जे रूप आपण त्याला द्यावे तेच त्याचे रूप असते. यासाठी आपण कोणत्याही रूपामध्ये त्याचे ध्यान केले तरी चालते. नामातून अनंत रूपे उत्पन्न होतात आणि अखेर त्यामध्येच ती लीन होतात. म्हणून भगवंताचे नाम श्रेष्ठ आहे. हे त्याचे नाम तुम्ही आवडीने, अखंड घ्या आणि आनंदात रहा. दानात दान अन्नदान, उपासनेत उपासना सगुणाची उपासना, आणि साधनात साधन नामस्मरण.

# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

## श्री लक्ष्मी व नरसिंह मंदिर निरा नरसिंगपूर



१०) तारा तीर्थ
महा सती तारा यांनी येथे कठोर तप केले तिच्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन भगवंतांनी तीला इच्छित वर दिला. त्यामुळे हे तीर्थ, स्त्रियांचे सौभाग्य, कुटुंबाचे कल्याण व मनोकामना पूर्ण करणारे मानले जाते.

११) दूर्वासा तीर्थ
महर्षी दूर्वासानी येथे दीर्घकाळ तपश्चर्या करून आत्मज्ञान प्राप्त केले. त्यामुळे हे स्थान तपोभूमी म्हणून प्रसिद्ध झाले. येथे स्नान, जप ध्यान केल्यास अध्यात्मिक उत्कर्ष होतो.

१२) कपिल तीर्थ
महर्षी कपिल यांनी येथे इतर ऋषींना सांख्य तत्त्व ज्ञानाचा उपदेश केला, म्हणून हे तीर्थ ज्ञान वैराग्य व मोक्ष मार्गाचे.

१३) दुर्गा तीर्थ
येथे दुर्गा मातेचे प्राचीन स्थान आहे. परंपरे नुसार कोकणातून देवी इथे प्रकट झाली, असे मानण्यात येते. जवळच विमलेश्वर महादेवाचे ही स्थान आहे.

# सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

## आनंद-प्रसन्नता कशी मिळवाल

मित्रांनो आणि वाचकहो, मी तुम्हाला असा प्रश्न विचारला की तुम्ही आनंद व प्रसन्न वाटण्यासाठी काय करता? तर मला वाटते प्रत्येक व्यक्ती याचे ऊत्तर आपापल्या वैयक्तिक अनुभव, परिस्थिती व बुद्धी नुसार देईल. बरोबर ना? पण यात अनेक घटक येतात, जसे आनंदी व प्रसन्न वाटण्यासाठी वय साधने व पैसा यापासून ते समाधान शांती, विचारशैली याचाही समावेश होईल. वा अगदी असेही म्हणता येईल की; कोणाला कशात आनंद-प्रसन्नता येईल हे आपण एका निश्चित ठोक-ताल्यात किंवा मोजमापात सांगू शकत नाही. पण सर्व साधारणपणे आपण गृहस्थाश्रमात ते वृध्दत्वा- पर्यंत म्हणा कशात आनंद-प्रसन्नता येते हे ढोबळमानाने पाहू,चर्चा करूया.. आनंद- प्रसन्नता याच्या विरोधी अर्थाचा शब्द आहे, नैराश्य, दुःख वा खिन्नता होय. अध्यात्म सांग ते निसर्गात जी पंचतत्वे आहेत तिच आपल्या शरिरात आहेत. म्हणून चांगले बोलणे, चांगले ऐकणे आणि चांगले वागणे म्हणजेच सदाचारी वृत्तीने निसर्ग आपणास साथ देतो व आपणास आनंद वाटतो ईतके खरचं हे सोपं आहे काय? नाही. म्हणून मग आपल्या वर्तनात सुधारणा, समानता,समाधानी व दानत ठेऊन आचरण करणे! आकाशातील चंद्र-चांदण्याकडून प्रकाश घेऊन जगाला ध्या.जसे निरनिराळ्या रंगाची फुले काट्यात जरी राहतात व फुलतात व जगाला आनंद देतात.. आपणही प्रसन्न राहून जगाला आनंद दिला तर आपणही आनंदी व्होऊ अल्प प्रकाश देणारी पणती पण ती मिणमिणते व मंदगतीने सदैव तेवते!जणू सूर्याला विश्रांती देते!मित्रांनो निराशा (मूड ऑफ)वेळेची शक्ती व वित्त यातूनच येते. म्हणून प्रसन्नचित्त होण्यासाठी झाडापासून मिळणार्या फुलाफलाची जीवनगाणी मिळवित रहावी,निसर्ग एवढे भरभरून देतो त्याचे ऊतराई होण्याचा प्रयत्न करावा,त्या विश्वकर्त्याचे आभार मानावे आणि समाधानाने जगावे..ओ.के.आज एवढे पुरे. स्वस्थ राहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग माणसा- माणसाचे वाचत राहा. आजचा दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना. सुप्रभात.



# मायग्रेन किंवा तीव्र डोकेदुखीचा त्रास

ज्योतिर्मय साहित्य

आयुर्वेदानुसार या दिवसांत शरीरात वात आणि कफ दोष वाढल्यामुळे हे त्रास अधिक होतात.

यावर काही प्रभावी घरगुती उपाय खालीलप्रमाणे आहेत-- १. अद्रक-तुळशीचा चहा (आले व तुळस)

पावसाळी डोकेदुखीसाठी आले हे अत्यंत गुणकारी आहे. आल्यातील दाहशामक गुणधर्मांमुळे रक्तवाहिन्यांना मिळणारा आराम डोकेदुखी कमी करतो.

उपाय : पाण्यात आल्याचे तुकडे, तुळशीची पाने आणि थोडे मिरे टाकून उकळून घ्या. हा चहा गरम असताना घेतल्यास कफ मोकळा होतो आणि डोकेदुखी कमी होते.

२. सुंठ लेप : डोकेदुखी तीव्र असेल, तर सुंठ (सुकवलेले आले) हा सर्वात जुना आणि प्रभावी उपाय आहे.

उपाय : सुंठीची पावडर थोड्या कोमट पाण्यात किंवा दुधात कालवून त्याचा घट्ट लेप कपाळावर लावावा. लेप सुकल्यानंतर डोके हलके वाटते.

३. वाफ घेणे : पावसाळ्यात सायनसमुळे होणाऱ्या डोकेदुखीसाठी वाफ घेणे हा उत्तम मार्ग आहे.

उपाय : गरम पाण्यात पुदिना किंवा तुळशीची पाने टाकून वाफ घेतल्यास नाक मोकळे होते आणि डोक्यावरील ताण कमी होतो.

४. गायीचे तूप (नासिका उपचार)

आयुर्वेदानुसार, नाकात गायीचे शुद्ध तूप टाकणे (नस्य) हे मायग्रेनसाठी अत्यंत फायदेशीर आहे.

उपाय : रात्री झोपताना दोन्ही नाकपुड्यांत कोमट तुपाचे १-२ थेंब टाकावेत. यामुळे मज्जासंस्थेला शांतता मिळते आणि डोकेदुखीचा त्रास कमी होतो.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

५. योगासने आणि प्राणायाम -- पावसाळ्यात घराबाहेर जाता येत नसल्याने शारीरिक हालचाल कमी होते, ज्यामुळे ताण वाढतो.

उपाय : सकाळी १०-१५ मिनिटे अनुलोम -विलोम आणि भ्रामरी प्राणायाम केल्याने मेंदूला ऑक्सिजनचा पुरवठा सुधारतो आणि मायग्रेनचा त्रास आटोक्यात राहतो.

काही महत्त्वाच्या टिप्स :

पाणी भरपूर प्या : अनेकदा निर्जलीकरणामुळे (डिहैड्रेशन) डोकेदुखी वाढते. कोमट पाणी पिणे जास्त हिताचे ठरते.

वेळेवर जेवण : पावसाळ्यात भूक कमी लागते, पण उपाशी राहिल्याने मायग्रेनचा झटका येऊ शकतो. हलका आहार घ्या.

झोप : रात्री ७-८ तासांची शांत झोप घ्या. अनियमित झोपेमुळे मायग्रेन वाढतो.

चहा-कॉफी टाळा : जास्त कॅफिनमुळे डोकेदुखी बळावू शकते. त्याऐवजी हर्बल टी घ्या.

पावसाळ्यातील मायग्रेन आणि डोकेदुखीपासून सुटका: प्रभावी उपाय

पावसाळ्यात हवामानातील बदलामुळे डोकेदुखी वाढते का? ही माहिती तुमच्यासाठी!

आल्याचा चहा : आले आणि मिरे यांचा काढा कफ कमी करून डोके हलके करतो. सुंठ लेप : सुंठ पावडरचा लेप कपाळावर लावल्यास वेदना थांबतात.

नस्य : रात्री नाकात गायीच्या तुपाचे २ थेंब टाकल्यास मायग्रेनमध्ये आराम मिळतो.

प्राणायाम : भ्रामरी प्राणायामाने मज्जासंस्था शांत होते.

# प्रभातपुष्प

## षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### दहीहंडी

दहीहंडी फोडण्या आज
जमला गल्लोगली इथे
बाळ गोपाळांचा मेळा
दही,दूध,लोणीसवे
लह्यांचा प्रसाद घेण्या
कृष्णभक्त झाले गोळा

गल्लोगल्ली जल्लोष आज
दहीहंडी फोडण्यासाठी पहा
कृष्णभक्त जमले फार
थरावर थर रजूनी
जाता आसमंती होतो
पाऊस,पाण्याचा मार

# सोनियाचा दिवस आजि अमृते पाहिला...


ज्योतिर्मय साहित्य

आकाशात पाखराप्रमाणे उडू शकता,समुद्रात माशाप्रमाणे खोलवर वावरू शकता हे तर मला माहीतच आहे पण पृथ्वीवरच माणसाप्रमाणे वागणे तुम्ही अजून शिकला आहात काय? ते शिकण्यासाठी तुम्हांला भारतीय संस्कृत विद्या मार्गदर्शन करू शकेल. एका भारतीय तत्त्वज्ञानाने भारतीय संस्कृतीचे माहात्म्य सांगताना उदगारलेले वाक्य आहे.ते तत्त्वज्ञ दुसरे कोणी नसून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन होते. स्वामी विवेकानंदानंतर सर्व जगात भारतीय तत्त्वज्ञानाचा संदेश पोहोचविण्याचे फार महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास केलेला त्यांच्यासारखा गाढा पंडित मिळणे केवळ अशक्य होय.

असा हा जीवनपट

डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म इसवी सन १९८८ मध्ये मद्रास प्रांतातील तिरुत्तानी तीर्थक्षेत्री झाला. तिरुत्तानी पासून तिरुपती हे देवस्थान आहे; अशा मंगलमय वातावरणात त्यांचे बालपण गेले. त्यांचे वडील तहसीलदार होते घरातील धार्मिक वातावरणाचा प्रभाव त्यांच्या विचार, वाचनावर पडला. प्राथमिक शिक्षण तिरुत्तानी या गावी झाले. वयाच्या आठव्या वर्षी माध्यमिक शिक्षणासाठी तिरुपती येथील मिशन स्कूल मध्ये प्रवेश घेतला. या शाळेतून इसवी सन १९०३ मध्ये मॅट्रिकची परीक्षा उच्च श्रेणीत उत्तीर्ण झाले. उच्च शिक्षणाकरिता त्यांनी व्हूरीज कॉलेजात प्रवेश घेतला. बीए परीक्षा पहिल्या वर्गात पहिल्या क्रमांकांनी उत्तीर्ण झाले .बीए साठी तत्त्वज्ञान हा विषय त्यांनी योगायोगानेच निवडला ही निवड किती सार्थ होती याचे प्रत्यंतर आपणास आलेच आहे. मद्रास व म्हैसूर येथील विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले.

म्हैसूरहून ते कलकत्ता येथे पंचम जॉर्ज यांच्या नावाने असलेले मानसिक व नैतिक तत्त्वज्ञानाचे विद्यासन भूषविण्यास गेले. या ठिकाणी वीस वर्षाहून अधिक काळ कलकत्ता विद्यापीठाशी त्यांचा संबंध होता. याच ठिकाणी त्यांच्या बौद्धिक तेजाला एक झालर आली. त्यांची ख्याती एक विद्वान प्राध्यापक म्हणून सर्व जगभर पसरली. त्यांना इंग्लंड अमेरिकेतून व्याख्यानासाठी निमंत्रणे येऊ लागली. इसवी सन १९३१ ते १९३६ या काळात त्यांनी आंध्र विद्यापीठाची उभारणी केली. या ठिकाणी कुलगुरू म्हणून केलेले कार्य उल्लेखनीय आहे. बनारस हिंदू विद्यापीठाचे कुलगुरू म्हणूनही त्यांनी काम केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर घटना समितीवर काम करण्याची त्यांना संधी मिळाली.या संधीचेही त्यांनी सोने केले इसवी सन १९५२ मध्ये त्यांची भारताचे उपराष्ट्रपती म्हणून निवड झाली. या पदावर ते सन १९६२ पर्यंत म्हणजे त्यांची राष्ट्रपती म्हणून निवड होईपर्यंत राहिले असे म्हणतात की काही पदांमुळे माणसाला श्रेष्ठत्व येते तर काही पदांची श्रेष्ठता काही व्यक्तींमुळे वाढते. डॉ राधाकृष्णन यांच्या श्रेष्ठ विचारांमुळे उपराष्ट्रपती, राष्ट्रपती व १९५४ मध्ये मिळालेला सर्वोच्च नागरिक भारतरत्न सन्मान पदे सर्वश्रेष्ठ ठरली.डॉक्टर राधाकृष्णन यांना शिक्षणाची संकुचित दृष्टी मान्य नव्हती.शिक्षण हे सर्वसमावेशक असले पाहिजे. माणूस केवळ साक्षर बनला पाहिजे असे नसून साक्षरता हा एक शिक्षणाचा परिणाम आहे. शिक्षणात व्यक्तीचे मन, बुद्धी व आत्मा यांच्या विकासाची बीजे आहेत. शिक्षणाने मन परिपक्व झाले पाहिजे. बुद्धी विकसित झाली पाहिजे व आत्म्याला स्वतः चे स्वरूप कळले पाहिजे. डॉ राधाकृष्णन यांचे विचार पाहता त्यात धार्मिक शिक्षण, कार्यवाद आंतरराष्ट्रीय सामंजस्य, धर्म आणि विज्ञान या सर्वांचा सुरेख मिलाफ झालेला आहे. प्रकाशाने अंध:कारावर, ज्ञानाने अज्ञानावर हळूहळू विजय मिळवणे म्हणजे शिक्षण. तमसो मा ज्योतिर्गमय असे शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे असेच त्यांना सांगावयाचे होते. शिक्षकांबद्दल परकाष्ठेचे प्रेम व्यक्त करणारे डॉ. राधाकृष्णन आपल्या जन्मदिनी शिक्षकांचा सन्मान व्हावा या उद्देशाने शिक्षक दिन साजरा करण्याची इच्छा व्यक्त करतात. सर्व भारतभर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा होऊ लागला. शिक्षकांनी तेजस्वी राष्ट्र निर्माण करण्यासाठी स्वतःच्या कष्टाने प्रयत्नाने आपली पात्रता सिद्ध केली पाहिजे. शिक्षकाजवळ व्यवसायनिष्ठा, अदययावत ज्ञान. विद्यार्थ्यांबद्दल प्रेम त्यांच्या विकासाची तळमळ असेल तर निश्चितच समाज त्यांचा आदर करेल.





सौ शुभांगी हेमंत पांगरकर,
श्री स.भु.प्रशाला,
छत्रपती संभाजीनगर

गुरुजनी ऐसे द्यावे धडे,
आपला आदर्श ठेवून पुढे। विद्यार्थी तयार चहूकडे।
राष्ट्र होई तेजस्वी।। असे जीवन आणि शिक्षण साधावे गठबंधन, प्रथमपासूनचि सर्वांगीण।
शिक्षण द्यावे तारतम्ये।।

प्राचीन काळापासून शिक्षकाला आदराचे स्थान आहे. गुरु म्हणजे साक्षात परमेश्वर अशी श्रद्धा प्रत्येकाच्या मनात होती परंतु दिवसेंदिवस ही भावना, श्रद्धा बदलत आहे कारण काळाच्या ओघात शिक्षण व्यवस्थेतही बदल झालेला आहे. शिक्षणाचा भर स्पर्धा-गुणांवर दिला जाऊ लागला व ज्ञानसाधना हा विचार मागे पडला. बालकांचा विकास साधण्यापेक्षा परीक्षेत जास्तीत जास्त यश कसे मिळवता येईल याला महत्त्व प्राप्त झाले आहे. शिक्षकांवरही अशैक्षणिक कामांचा बोजा वाढला आहे. हे वातावरण समाजातून दूर करण्यासाठी शिक्षकांनी मी एक शिक्षक आहे हे स्वाभिमानाने सांगावे व त्याप्रमाणे स्वाभिमानाने काम करावे. निर्भय शिक्षक चांगले विद्यार्थी निर्माण करू शकतात.

नवीन विचारांचा प्रसार शिक्षकाशिवाय दुसरा कोण करू शकेल? जो सतत प्रगतीपथावर असतो तोच त्यांचा आदर्श बनतो. अशा आदर्श गुरुजींविषयी मुलांच्या मनात

गुरुगोविंद दोऊ खडे, काके लागो पाय ?
बलिहारी गुरु आपकी गोविंद दियो बताय।।

या संत तुलसीदास यांनी लिहिल्याप्रमाणे गुरु व गोविंद एकाच वेळी समोर आले तर प्रथम गुरूला वंदन केले पाहिजे. त्या गुरुजींनीच हे भगवंताचे स्वरूप दाखविले. भगवंतापेक्षाही गुरु श्रेष्ठ आहे ही भावना निर्माण व्हायला वेळ लागणार नाही. डॉ राधाकृष्णन यांच्यासारख्या आदर्श शिक्षकांच्या जन्मदिनी आपण आपली जबाबदारी पेलण्यास सज्ज होऊया !! कारण जिथे गती आहे,प्रगती आहे तिथे शिक्षक आहे.

एक शिक्षक म्हणून आज हेच नमूद करावेसे वाटते.



# संत तुकाराम प्राथमिक विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूल येथे भारताचे माजी राष्ट्रपती, महान शिक्षणतज्ज्ञ व तत्त्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास ज्ञानसंदिप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश सोनवणे तसेच संस्थेच्या सचिव संगीताताई खिल्लारे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी **मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य तसेच शिक्षकांची विद्यार्थ्यांच्या जीवनातील भूमिका याबद्दल सविस्तर माहिती दिली. शिक्षक केवळ विद्यार्थ्यांना विषयाचे ज्ञान देत नाहीत, तर त्यांच्यामध्ये संस्कार, शिस्त, आत्मविश्वास, सामाजिक जाणीव आणि जबाबदारीची भावना निर्माण करून त्यांना भविष्यासाठी सक्षम बनवतात, असे त्यांनी सांगितले.

**विद्यार्थ्यांनी सांभाळली शिक्षकांची भूमिका**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून शाळेत आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी एक दिवस शिक्षकांची भूमिका स्वीकारून शाळेचे कामकाज सांभाळले. विद्यार्थ्यांनी वर्गात अध्यापन करण्याबरोबरच शाळेतील विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या दैनंदिन कार्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. अध्यापन करणे, विद्यार्थ्यांचे व्यवस्थापन करणे, त्यांना समजावून सांगणे आणि प्रत्येक विद्यार्थ्याकडे लक्ष देणे हे किती जबाबदारीचे कार्य आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना झाली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि जबाबदारीची भावना विकसित होण्यास मदत झाली.

यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत मनोगते सादर केली. शिक्षकांनी केलेले मार्गदर्शन आणि दिलेले संस्कार याबद्दल विद्यार्थ्यांनी भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुनील चौधरी, साहेबराव शिंदे, विजय पाटील, हर्षल पगारे व शितल धुगे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षल पगारे यांनी प्रभावीपणे केले, तर सुनील चौधरी यांनी आभार मानले. शिक्षक दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे शाळेच्या परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. गुरुजनांप्रती आदर, कृतज्ञता आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा संदेश देणारा हा शिक्षक दिन सोहळा संस्मरणीय ठरला.

# प्रा. डॉ. जयपाल पाटील यांना रायगड पोलिसांचा जीवनदूत पुरस्कार जाहीर



ज्योतिर्मय साहित्य

अलिबाग - रस्ता सुरक्षा अभियान २०२६ आरसीएफ थर्ड सभागृह कुरुळी कॉलनी तालुका अलिबाग येथे ७ सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न होणार असून रायगड जिल्ह्यात आपत्ती सुरक्षेच्या वेळी मदत करणारे २२ नागरिक व संस्था यांना जीवनदूत पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे, यामध्ये अलिबागचे आपत्ती व्यवस्थापन तज्ञ, प्रशिक्षक समाजसेवक रायगड भूषण प्रा. डॉ. जयपाल पाटील यांचा समावेश असून कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यासाठी रायगड वाहतूक शाखेचे हवालदार श्री. साळुंखे आणी श्री. मंगेश कावजी यांनी डॉ.जयपाल पाटील यांच्या निवासस्थानी येऊन दिले. हा कार्यक्रम रोजगार हमी योजना उत्पादन खार भूमी विकास खात्याचे महाराष्ट्र शासनाचे मंत्री तथा रायगडचे पालकमंत्री नाम. भरत गोगावले, महिला व बालविकास मंत्री महाराष्ट्र शासन नाम. कु.अदिती तटकरे यांच्या शुभहस्ते तर कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती खासदार श्री. श्रीरंग बारणे, खासदार श्री. सुनील तटकरे, माजी खासदार श्री. धैर्यशील पाटील, आमदार श्री. निरंजन डावखरे आमदार श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, आमदार श्री. विक्रांत पाटील, आमदार श्री. प्रशांत ठाकूर, आमदार श्री. रवींद्र पाटील, आमदार श्री. महेंद्र थोरवे, आमदार श्री. महेश बालदी, आमदार श्री. महेंद्र दळवी, श्री. चंद्र किशोर मीना विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण, श्री किसन जावळे जिल्हाधिकारी रायगड, श्रीमती नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड प्रमुख उपस्थितीत संपन्न होत आहे. असे निमंत्रण श्री अभिजीत शिवथरे अपर पोलीस अधीक्षक रायगड व श्रीमती आंचल दलाल पोलीस अधीक्षक रायगड यांनी दिले आहे.

प्राध्या. डॉ. जयपाल पाटील हे रायगड जिल्हा नागरी संरक्षण दलाचे जनसंपर्क अधिकारी होते, त्यांनी आत्तापर्यंत संपूर्ण देशभरात ७०५ माझे कुटुंब माझी जबाबदारी सुरक्षा विषयक व्याख्याने, शाळा महाविद्यालय पोलीस, ग्रामसेवक, तलाठी, दिली असून, आकाशवाणी मुंबई कोल्हापूर सोलापूर पुणे, रत्नागिरी,व २वेळा जागतिक आपत्ती परिषदेमध्ये व्याख्याने दिली आहेत, सध्या रायगड जिल्हा परिषदेच्या ८११ ग्राम पंचायतीमध्ये त्यांचा कार्यक्रम सुरू आहे. रायगड जिल्ह्यातील प्रत्येक नागरिक आपत्तीला सामोरे जाणारा तयार व्हावा असा त्यांचा ध्यास आहे, सध्या त्यांनी लाखो नागरिकांना प्रशिक्षण दिले आहे, तर केंद्र शासनाच्या गृह खात्यातर्फे शाळा महाविद्यालयातील आठवीच्या पुढील विद्यार्थ्यांना आपत्ती सुरक्षेचे प्रशिक्षण दिले पाहिजे म्हणून त्यांनी २५ अधिकारी, महाविद्यालय व माध्यमिक शाळा जोहे येथील २५शिक्षक, नागाव, चौल रायगड जिल्हा परिषद च्या प्राथमिक शाळेतील ६० शिक्षकांना प्रशिक्षण दिले आहे. रस्त्यात कुठलाही अपघात झाला तर १०८ रुग्णवाहिके मार्फत ते त्वरेने मदत जिल्ह्यातील रस्त्यावरील वाहतुकीच्या वेळी करतात, या देशसेवेमुळे त्यांना जीवनदूत पुरस्कार रायगड पोलिसांनी जाहीर दिला आहे.




सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

## अभावातून प्रभावाकडे...



अपर्णा परांजपे, कात्रज पुणे. मो. 95030 45495

### विचारांच्या पलीकडे-साक्षीच्या प्रकाशात वर्तमान

पुढे.....

वर्तमानात जगणे आणि आत्मजागरूकता आपले जीवन बाहेरून पाहता वर्तमानात दिसत असते; पण आपले मन मात्र अनेकदा कुठेतरी दुसरीकडेच असते. शरीर आजमध्ये असते आणि मन कधी एखाद्या भूतकाळातील घटनेची पुनरावृत्ती करत असते, तर कधी येणाऱ्या उद्याची कल्पना करत असते. एखादा जुना अपमान आपण वर्षानुवर्षे मनात वाहत राहतो आणि भविष्यात मिळणारे एखादे यश आजपासूनच जगू लागतो. अशा प्रकारे आपल्या डोळ्यांसमोर असलेले जीवनही हळूहळू आपल्या हातातून निसटत जाते.

आपल्याला शांतता हवी असते; पण आपले मन सतत विचारांनी भरलेले असते. एक विचार संपतो न संपतो तोच दुसरा सुरू होतो. एखादी जुनी गोष्ट आठवली की तिच्याशी संबंधित अनेक गोष्टी मनासमोर येऊ लागतात.

भविष्याची एखादी छोटीशी चिंता मनात एक संपूर्ण कथा निर्माण करते. हळूहळू आपल्याला वाटू लागते की आपण जीवन समजून घेत आहोत; प्रत्यक्षात मात्र आपण आपल्या विचारांच्याच जाळ्यात अधिकाधिक गुंतत जात असतो.

आपल्या अंत:करणात पाहण्याची क्षमता सदैव विद्यमान असते; पण स्मृती, इच्छा आणि कल्पनांच्या अनेक थरांनी तिच्यावर धूळ साचलेली असते. धुळीने झाकलेला आरसा जसा चेहरा स्पष्ट दाखवू शकत नाही, त्याचप्रमाणे विचारांनी झाकलेली चेतना वास्तवाकडे स्पष्टपणे पाहू शकत नाही.

म्हणून आत्मज्ञान म्हणजे कदाचित एखादी नवीन गोष्ट प्राप्त करणे नव्हे. आपल्या दृष्टीला धूसर करणाऱ्या ज्या गोष्टी आहेत, त्यांना ओळखण्यापासून आत्मज्ञानाची सुरुवात होते.

अतीत आपल्याला कसे बांधून ठेवतो?

आपल्याला अनेकदा वाटते की आपण वर्तमान परिस्थितीकडे पाहत आहोत; पण अनेक वेळा आपण ती भूतकाळाच्या चष्म्यातून पाहत असतो.

एखाद्याने पूर्वी आपल्याला दुखावले असेल, तर त्याच्यासारखी परिस्थिती पुन्हा समोर आली की जुनी भीती जागी होते.

(क्रमश:)



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'बहीण-भाऊ' (अतूट विश्वासाचा रेशीमबंध)

पुढे दोघेही आपापल्या संसारात रमून जातात; पण एकमेकांची विचारपूस केल्याशिवाय त्यांना करमत नाही. भावाचा काही निरोप किंवा फोन येतो का, म्हणून बहीण डोळे लावून वाट पाहत असते. गावाकडे असलेल्या भावाला ही बहीण पुन्हा सणासुदीला भेटायला जाते. दिवाळी, भाऊबीज किंवा राखीपौर्णिमेचे निमित्त साधून एकमेकांपासून दुरावलेली ही मायेची जोडी पुन्हा एकत्र येते आणि जुन्या गोड आठवणींत रमताना मनाला तृप्तता लाभते.

सासरी गेलेल्या बहिणीला आपल्या भावाकडून फार अपेक्षा नसतात. पण भावाने आपली आठवण ठेवावी, दिवाळीसारख्या सणाला आवर्जून माहेरी बोलवावे, त्या निमित्ताने चार दिवस माहेरी घालवता यावेत, राखीपौर्णिमेला आपली आठवण ठेवावी... अशा तिच्या माफक अपेक्षा असतात. तसं तर तिला तिच्या संसारात काही कमी नसतं; पण तरीदेखील 'माहेरची साडी' आणि भावाचं प्रेम तिला जगात सर्वात जास्त प्रिय असतं. (क्रमश:)

## विचार ते विजय



लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013

### तुमच्या सवयीच तुमचं भविष्य लिहितात

पुढे....
रोज कोणत्या विचारांना मनात जागा देतो...
रोज किती मेहनत करतो...
रोज किती वेळ मोबाईलला देतो...
रोज आपल्या माणसांसाठी किती वेळ काढतो...
रोज स्वतःच्या चुका किती प्रामाणिकपणे स्वीकारतो...
याच गोष्टी उद्याच्या आपल्याला घडवत असतात.
एक वाईट सवय पहिल्या दिवशी फारशी नुकसानकारक वाटत नाही.
पण तीच सवय वर्षानुवर्षे चालू राहिली तर आयुष्याची दिशा बदलते.
"आज नको... उद्यापासून."
"आज थकलोय..."
"आज वेळ नाही..."
"आज शेवटचा वेळ..."
हे छोटे शब्द असतात.
पण याच शब्दांनी कितीतरी स्वप्नं वर्षानुवर्षे पुढे ढकलली जातात.
आणि एक दिवस आरशात स्वतःकडे पाहताना प्रश्न पडतो—
"मी इतका मागे कधी पडलो?"
उत्तर एकाच दिवसात सापडत नाही.
तो प्रत्येक त्या दिवसात सापडतो...
ज्या दिवशी आपण स्वतःला म्हटलं होतं—
"उद्या करू."
म्हणून सवयींची ताकद ओळखा.
रोज दहा मिनिटं वाचणारा माणूस वर्षांनी वेगळा दिसतो.
रोज थोडी बचत करणारा माणूस संकटात कमी घाबरतो.
रोज व्यायाम करणारा माणूस शरीराला साथ देतो.
रोज प्रेमाने बोलणारा माणूस घरात प्रेमाची भाषा निर्माण करतो.
रोज आई-वडिलांना फोन करणारा माणूस नात्यांमध्ये अंतर पडू देत नाही.
आणि रोज स्वतःशी प्रामाणिक राहणारा माणूस—
हळूहळू स्वतःचा सर्वात चांगला मित्र बनतो.
"भविष्य लिहिण्यासाठी हातात पेन लागत नाही; रोजच्या सवयी पुरेशा असतात.
आजची प्रत्येक छोटी सवय उद्याच्या आयुष्यावर आपली सही करत असते.

# तिरुपती बालाजी – श्रीवारी सेवा अनुभव

ज्योतिर्मय साहित्य

**गोविंदाचा जयघोष आणि दर्शनाची ओढ**

वेंकटरमना गोविंदा च्या जयघोषात आणि गर्दीच्या रेट्यारेटीतच गाभाऱ्यात प्रवेश करता आला. पुढे गर्दीचे व्यवस्थित नियोजन झाल्याने श्री वेंकटेशाचे नखशिखांत दर्शन शांतपणे घेता आले.

ध्यानी–मनी काही नसताना श्रीकांत लीगदे यांचा अचानक फोन आला – ''आपल्याला बालाजीच्या सेवेला जायचे आहे आणि तुला यायचेच आहे, नाही म्हणायचे नाही,'' असा जरासा दमच त्याने भरला. अनेक अडचणी समोर आ वासून उभ्या असताना, सर्व काही वेंकटेशावर सोडून मीही तयारीला लागलो. अशक्य वाटणाऱ्या दहा दिवसांच्या रजेपासून ते आर्थिक बाबींपर्यंत सर्व गोष्टी वेंकटेशाच्या कृपेने सहजतेने सुटत गेल्या आणि तिरुपती बालाजीच्या दर्शनाचा तसेच सेवेचा मार्ग मोकळा होत गेला.

**प्रवास आणि तिरुमलावरील आगमन**

आणि शेवटी तो दिवस उजाडला. १८ ऑगस्टला रात्री अजिंठा एक्स्प्रेसने सिकंदराबाद आणि पुढे तिरुपती एक्स्प्रेसने २० ऑगस्टला आम्ही तिरुपतीला पोहोचलो. श्रीकांतने सर्व व्यवस्था आधीच करून ठेवल्यामुळे तिरुमलाला जाण्यासाठी गाडी हजर होती. सकाळच्या निसर्गरम्य वातावरणातील नाश्त्यानंतर आम्ही तिरुमलावर पोहोचलो.

एकूण २६ एकरात पसरलेल्या परिसरात विविध ठिकाणांहून आलेले सर्व भक्तगण भक्तिसागरात न्हाऊन निघताना दिसत होते.

**निवास व्यवस्था – एक आदर्श शिस्त**


सेवा देणाऱ्या पुरुष सेवेकऱ्यांसाठी श्रीवारी सेवा सदन (२) मध्ये सुनियोजित व्यवस्था केली होती, तर महिलांसाठी श्रीवारी सेवा सदन (१) मध्ये व्यवस्था होती. १२८ डोर्मेटरी बेडचे ३ सुसज्ज हॉल, प्रत्येक हॉलमध्ये १२ स्नानगृहे व १२ शौचालये, २४ तास गरम व थंड पाण्याची सोय.

अतिशय स्वच्छ, सुंदर व शिस्तप्रिय पद्धत पाहायला मिळाली. प्रत्येक सेवेकऱ्याला रांगेत उभे करून चेकिंग, तसेच कुलूप व बेडचे वाटप केले जात होते. कुठलाही गोंधळ नाही, गडबड नाही की आरडाओरडा नाही, सगळं कसं नीटनेटकं. आपण खरंच भारतात आहोत की नाही, असं वाटायला लागायचे. आजूबाजूचा निसर्ग तर फारच छान – उंच उंच टेकड्या, हिरवीगार झाडी. ''काय ती झाडी आणि काय ते डोंगर,'' असे म्हणायची वेळ आली होती.

**वैकुंठ कॅन्टीन येथील सेवा**

सकाळी ११ वाजता आम्हाला वैकुंठ कॅन्टीन क्र. २ येथे खिचडी आणि चहा–कॉफी वाटपाची सेवा मिळाली.

सर्व भक्तांना व्यवस्थित दर्शन व्हावे यासाठी व्यवस्थापनाने ६७ कंपार्टमेंट करून गर्दीचे नियोजन केले आहे. याच कंपार्टमेंटमध्ये



भक्तांना दर्शनाच्या प्रतीक्षेत बसण्याची सोय, तसेच कंपार्टमेंटच्या बाहेर पिण्याच्या पाण्याची आणि वॉशरूमची सोय केलेली आहे. याच प्रत्येक कंपार्टमेंटमध्ये भक्तांना खिचडी, चहा–कॉफी अगदी शिस्तबद्ध पद्धतीने वाटताना आम्हाला मनस्वी आनंद होत होता. थकून–भागून आलेल्या भुकेल्या भक्तांना सेवा देण्यात धन्यता वाटत होती.

आमच्या ग्रुपचे रिपोर्टिंग, सुपरवायझर श्री. प्रभाकरण यांच्याकडे होते. सकाळी त्यांना रिपोर्टिंग केल्यानंतर आणि त्यांनी ड्युटी नेमून दिल्यावर त्यांची भेट थेट संध्याकाळीच व्हायची. दिवसभरात आमचा ग्रुप काय करतोय हे पाहायला देखील कोणी यायचे नाही. दिवसभरात एकदा खिचडी व दोनदा चहा–कॉफी दिल्यानंतरचा वेळ पूर्ण रिकामा राहायचा. सेवेकऱ्यांचा तिथे ओघ असल्यामुळे कदाचित हे रिलॅक्सेशन मिळत असेल. उरलेल्या पाच दिवसांत कोणाला बॅग स्कॅनिंग तर कोणाला गर्दी नियंत्रणाची ड्युटी मिळाली.

**काही त्रुटी आणि सूचना**

सिक्युरिटी चेकिंग, बॅग चेकिंग ज्या ठिकाणी ठेवली होती, त्याच्या कितीतरी मागे ती ठेवायला हवी होती, जेणेकरून स्त्री–पुरुष चेकिंग करताना त्यांची ताटातूट झाली नसती व पुढे वेटिंगचा त्रास वाचला असता.

तेथील प्रशासनाने प्रत्येक गोष्टीसाठी कॉन्ट्रॅक्टर व त्याची माणसे नेमली आहेत. परंतु हे कॉन्ट्रॅक्टर येणाऱ्या प्रत्येक सेवेकऱ्याला आपला मजूर समजूनच कामाला लावतात. येणारा सेवक, त्याचे वय, त्याचे लिंग पाहूनच त्याला सेवा द्यायला हवी, परंतु ही मंडळी टणाटणाची पोती उचलायला लावतात किंवा ५०–५० किलोच्या खिचडीची दोन ते चार भांडी गाड्यांवरून ढकलायला लावतात. रोज टेबलवर काम करणारे हे सेवक गोविंदाची सेवा म्हणून काहीही करायला तयार होतात, परंतु त्यांचे वय त्यांना कितपत साथ देईल हे सांगता येत नाही. त्यात जर कुणाला शारीरिक इजा झाली तर त्याला कोण जबाबदार? वास्तविक या गोष्टींचा अंतर्भाव सेवेमध्ये आहे का, हे तपासून घेण्याची गरज आहे. आम्ही आमच्या सुपरवायझरशी बोलून ही सेवा रद्द करून घेतली होती.

**सर्वांसाठी गोविंदा**

गोविंदाला भेटायची आस सर्वांनाच असते, मग तो श्रीमंत असो की गरीब. प्रत्येक जण आपापल्या परीने दर्शनासाठी धडपडत असतो. कोणी पायथ्यापासून माथ्यापर्यंत चालत येऊन फ्री दर्शनात धन्यता मानतो, तर कोणी पैसे देऊन दर्शनात. येथे दहा हजार पाचशे रुपयांपासून ते तीनशे रुपयांपर्यंतच्या तिकिटाची व फ्री दर्शनाची व्यवस्था प्रशासनाने केलेली आहे.

दिव्यांग, सिनियर सिटीझन, तसेच एक वर्षाच्या आतील बाळासह येणाऱ्या आई–वडिलांसाठी वेगळी व्यवस्था पाहण्यात आली. परंतु अशी सेवा उपलब्ध आहे हे सामान्य माणसापर्यंत पोहोचलेलेच नाही. कारण पायथ्यापासून माथ्यापर्यंत अनेक गोरगरीब, वृद्ध, दिव्यांग हाल–अपेष्टा सहन करून गर्दीच्या रेटारेटीमध्ये स्वतःला झोकून देऊन दर्शन घेताना दिसत होते.

**मंदिरातील विशेष सेवा आणि दर्शन**

२४ तारखेला आम्हाला मंदिरात सेवा मिळाली. महिला व पुरुष मिळून एकूण १०० सेवेकऱ्यांनाच ही सेवा एकावेळेस मंदिर आणि मंदिर परिसरात दिली जाते.

सेवेमध्येच सर्वांना विशेष दर्शन दिले जाते, हा तर एक विशेष अनुभव होता. वेंकटेशाच्या समोर जास्तीत जास्त वेळ उभे राहून त्याचे नखशिखांत दर्शन घेता आले. त्याचे भव्य–दिव्य, गोजिरे स्वरूप डोळ्यात साठवण्याचा पुरेपूर प्रयत्न करत होतो, पण समाधान काही होत नव्हते.

येथे प्रकर्षाने एक गोष्ट जाणवली, ती म्हणजे गर्दीचे नियोजन. मंदिराच्या मुख्य दरवाजातूनच सर्व भक्तांची ये–जा चालू असते, त्यामुळे खूप मोठा लोंढा तिथे पाहायला मिळतो. व्यवस्थित नियोजन केले तर सर्व भक्तांना शांततेत दर्शन मिळू शकते, अशी मनाची पक्की धारणा झाली.

**परतीचा प्रवास – वेल्लोर**

**सुवर्ण मंदिर**

शेवटच्या दिवशी पुन्हा एकदा गोविंदाचे दर्शन घेण्याची संधी मिळाली. दर्शन करून आम्ही दुपारी वेल्लोरकडे निघालो. वाटेमध्ये एक सुंदर गणपती मंदिराचे दर्शन घेतले आणि रात्री अकरा वाजता वेल्लोरला मुक्कामाला आलो.

सकाळी भल्या पहाटे उठून आम्ही श्री महालक्ष्मीच्या दर्शनासाठी निघालो. पाण्यात उभ्या असलेल्या संपूर्ण मंदिरावर सोन्याचा मुलामा दिलेला आहे, त्यावर पिवळ्या प्रकाशाचा झोत टाकल्यामुळे मंदिर जणू सुवर्ण मंदिरच भासत होते. मंदिराच्या विस्तीर्ण परिसरात अनेक विविध फुलझाडे लावलेली होती. ब्रह्म मुहूर्तावरची देवीची आरती आणि मंगल वाद्ये मनाला प्रसन्नता देऊन गेली.

वापसीच्या प्रवासात बालाजीच्या आईचे मंदिर, श्री कालहस्ती मंदिर व इस्कॉन मंदिर पाहण्यात आले. तिरुपती आणि तिरुपती परिसरातील निसर्ग सौंदर्य, तेथील आल्हाददायक वातावरण आणि आम्ही घेतलेला सेवेचा लाभ, यामध्ये सहा दिवस कसे गेले हे आम्हालाच समजले नाही.

२७ ऑगस्टला संध्याकाळी नारायणाद्री एक्स्प्रेसने सिकंदराबाद व पुढे देवगिरी एक्स्प्रेसने आम्ही छत्रपती संभाजीनगरला २८ ऑगस्टला रात्री अकरा वाजता सुखरूप येऊन पोहोचलो. व्यंकटेशाच्या कृपेने सर्व काही व्यवस्थित पार पडले.

वेंकटरमना गोविंदा! गोविंदा!

बी. सुधीर
छत्रपती संभाजीनगर

## पुराणातील विश्व : एक चिकित्सक अन्वेषण (भाग ४)

शांडिल्यगोत्रोत्पन्नभालेरावमुकुन्दोऽहम्
छत्रपतीसम्भाजीनगरम्
विद्युतसन्देशसूत्रम्–bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाषक्रमान्क: ८३०८८३५३१३



### विष्णुपुराणातील ग्रहांची अंतरे : मूळ श्लोक आणि मांडणी

उत्तरार्ध.......

पृथ्वीपासून सूर्य, चंद्र आणि नक्षत्रे; त्यानंतर बुध, शुक्र, मंगळ, बृहस्पती आणि शनि; त्यानंतर सप्तर्षी आणि ध्रुव असा हा क्रम आहे, परंतु येथे एक अत्यंत महत्त्वाची वैज्ञानिक सावधगिरी आवश्यक आहे.

ही मांडणी आधुनिक खगोलशास्त्रातील प्रत्यक्ष कक्षीय अंतरांची यादी नाही. आधुनिक विज्ञानात पृथ्वीपासून सूर्याचे सरासरी अंतर, ग्रहांची सूर्यापासूनची सरासरी कक्षीय अंतरे, ग्रहांच्या कक्षा आणि ताऱ्यांची अंतरे या वेगवेगळ्या संकल्पना आहेत. विष्णुपुराणातील वरील वर्णन मात्र एका विशिष्ट विश्वरचनेतील आकाशीय स्तरांची उंची किंवा परस्पर अंतर सांगते. त्यामुळे पुढील टप्प्यावर आपल्याला दोन प्रश्न स्वतंत्रपणे विचारावे लागतील.

पहिला प्रश्न: या सर्व योजनांचे आधुनिक किलोमीटरमध्ये रूपांतर केले असता कोणती मूल्ये प्राप्त होतात?

दुसरा आणि अधिक महत्त्वाचा प्रश्न: त्या मूल्यांची आधुनिक खगोलशास्त्रातील संबंधित अंतरांशी तुलना केली असता खरोखर काही लक्षणीय साम्य दिसते का?

येथे 'योजन' या प्राचीन मापन एककाचा प्रश्न निर्णायक ठरतो. योजनाचे आधुनिक किलोमीटरमधील एकच सर्वमान्य रूपांतर स्वीकारणे योग्य ठरणार नाही. विविध भारतीय ग्रंथपरंपरांमध्ये मापनपद्धतींचे संदर्भ वेगवेगळे आहेत. त्यामुळे एका ठरावीक रूपांतरणावर आधारित सनसनाटी निष्कर्ष काढण्याऐवजी एकापेक्षा अधिक संभाव्य मूल्ये तपासणे अधिक शास्त्रीय ठरेल. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे विष्णुपुराणातील ही मांडणी आणि आधुनिक विज्ञान यांची तुलना करताना 'साम्य' आणि 'पूर्वज्ञान' यांमध्ये फरक करावा लागेल. एखादे संख्यात्मक मूल्य आधुनिक मूल्याच्या जवळ आले, तरी त्यावरून आधुनिक खगोलशास्त्रातील संकल्पना त्या काळी ज्ञात होत्या असा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. त्यासाठी त्या ज्ञानाच्या निर्मितीची स्वतंत्र ऐतिहासिक साखळी, निरीक्षणपद्धती आणि गणितीय आधार दाखवावा लागेल.

मात्र याचा अर्थ असा नाही की, या मोजमापांचे महत्त्व नाही. उलट, प्राचीन भारतीय विश्वकल्पनेने आकाशीय वस्तूंचे स्थान संख्यात्मक पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला, ही बाब देखील अभ्यासनीय आहे.

आता पुढील भागात आपण 'योजन म्हणजे किती?' हा मूलभूत प्रश्न घेऊ. त्यानंतर विष्णुपुराणातील १ लाख आणि २ लाख योजनांची आधुनिक किलोमीटरमध्ये संभाव्य रूपांतरे काढून, पृथ्वी–सूर्य, ग्रहांची कक्षीय अंतरे आणि इतर आधुनिक खगोलशास्त्रीय मोजमापांशी त्यांची तटस्थ, आकडेवारीवर आधारित तुलना करू.

# स्पर्धा परीक्षेची तयारी....

ज्योतिर्मय साहित्य

स्पर्धा परीक्षा म्हटले की खूप स्पर्धा आली, त्यामुळे त्याचे व्यवस्थित नियोजन हवे.. आजकाल स्पर्धा परीक्षा विषयी वृत्तपत्र, मासिके, नेट वर खूप माहिती उपलबध आहे.. वेगवेगळे दृक श्राव्य फिती पण उपलब्ध आहे... माननीय अविनाश धर्माधिकारी,विश्वास नागरे पाटील सर ह्या विषयातील जाणकार लोकांचे मार्गदर्शन उपलब्ध आहे.

अविनाश धर्माधिकारी सरांच विजय पथ हे पुस्तक जरूर वाचावे.. त्यातून अभ्यास कसा करावा, वेळेचे नियोजन, ई सर्व उपयोगी गोष्टींवर माहिती मिळेल. त्यातले दोन कोट खूप महत्वाचे जसे..

१) इफ यू फैल टू प्लॅन, यू प्लॅन टू फैल नियोजनाचे महत्व सांगितले आहे.


अभ्यासाच्या बाबतीतील.. २) एव्हरी थिंग इस नेसेसरी, बट नॉट सफीशीयंट ...

म्हणजे खूप अभ्यास करा. सगळेच वाचा.

माझ्या दृष्टीने महत्वाचा मुद्दा म्हणाजे फोकस्ड असणे.. हे महत्वाचे....

मी २४ वर्षापूर्वी जेव्हा पदवी परीक्षेनंतर अभ्यासाला लागले, तेव्हा माझी महाविद्यालयातील मुलांनी ''पुढे काय करणार?''असे विचारले.

मी ''स्पर्धा परीक्षेची तयारी करणार'',असे सांगितले. ते म्हणाले ''ते तर आम्ही ही करणार. पण पुढे शिकणार काय? ''मी'' नाही ''म्हतल्यावर त्यांनी मला वेड्यात काढले.. पण पुढे मला फर्स्ट



अटेंप्ट मध्येच महाराष्ट्र लोकसेवा आयगामार्फत नौकरी लागली आणि ते परीक्षेत सफल झाले नाही. त्यामुळे एकाच धेय्य ठेवणे आणि त्याचा पाठलाग करणे महत्वाचे.


स्पर्धा परीक्षां ह्या खूप विविध प्रकारच्या परीक्षा आहेत.जसे यूपी एस सी, स्टाफ सिलेकशन, बँकिंग इत्यादी..

आपल्या स्वभावाला, क्षमता,तसेच शैक्षणिक पात्रता, काहिं ठिकानी शारीरिक क्षमता (जसे पोलिस, सैन्य) नुसार निवड करावी..

बहुतेक सर्व परीक्षा मध्ये मराठी, इंग्रजी, सामान्य अध्ययन,आणि मानसिक क्षमता, ई चार विषय असतात.. परीक्षे नुरुप त्याचे गुणाचे प्रमाण कमी जास्त असते. कधी कधी मराठी नसतं पण इंग्रजी ची काठिण्य पातळी जास्त आसते. चौथी किंवा सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी जशी तयारी करतो, किंवा तिथे जसे ज्या प्रकारचे प्रश्न विचारले जातात त्या प्रकारचे प्रश्न असतात. पण थोडा दर्जा जास्त असतो. जसे भाषेमध्ये समानार्थी, विरुद्धार्थी शब्द,व्याकरण ई.. मानसिक क्षमता चाचणी मध्ये डायरेकशन, रिलॅशन, पॅटर्नचे गणिते, वेन डायग्राम, रेअसोनीन वर आधारित प्रश्न असतात.

सामान्य अध्ययन मध्ये इतिहास, भूगोल, नागरिक शास्त्र, संविधान, कृषी, विज्ञान, तसेच चालू घडामोडी ई विषयावर आधारित प्रश्न असतात. त्याच्या अभ्यास करण्यासाठी ८ ते १० वी ची राज्य तसेच केंद्रीय बोर्डाची पुस्तके प्रथम वाचावी. त्यानंतर के सागर, आनंद पाटील, तत्सम पुस्तके वाचावी..तसे त्या विषया वरची क्रमिक पुस्तके वाचावी. चालू घडामोडी साठी वर्तमानपत्रे, बातम्या वाचाव्या..

मोहिनी किन्हीकर हेडाऊ
नागपूर मो. 98229 40912



काही पदासाठी फक्त चाळणी परिक्षा असते. काही पदांसाठी चाळणीपरीक्षा व मुलाखत असे दोन प्रकार आसतात.तर काही अधिकारी पदासाठी चाळणी परीक्षा(), नंतर मुख्य परीक्षा... ही लेखी (डीस्क्रिपटीव्ह ) असते व त्यानंतर मुलाखत घेतल्या जाते.


मुलाखती साठी तुमचा बायो डेटा, पदवीचे ज्ञान, चालू घडामोडी ई वर आधारित प्रश्न विचारले जातात त्याची तयारी देखील करावी लागते, काही संस्थाकडून मॉक इंटरव्हिव घेतल्या जातात. त्याचा निश्चितच फायदा होतो. बरेचदा लेखी परीक्षा उत्तीर्ण होऊन ही मुलाखतीत अपयश येते. त्यासाठी आपल्या विषयाचा खोल अभ्यास असणे, निर्भयपणे उत्तरे देणे आवश्यक असते.


स्पर्धा परीक्षेची तयारी युद्ध पातळीवर करावी लागते. सर्व प्रथम सिलेबस चा अभ्यास करणे, मागील वर्षाचे पेपर च अभ्यास करणे वे गवेगल्या टेस्ट देणे, व्यवस्थित अभ्यास करणे, आपले स्वतःचे वेळापत्रक तयार करणे गरजेचे आहे.


सोबत परीक्षा देणाऱ्याने ग्रुप स्टडी करणे, ह्याने निश्चितच फायदा होतो.


आधी जे यशस्वी झालेत त्यांचा अनुभवाचं फायदा घेणे गरजेचे आहे. जेणे करून नेमका काय कसा अभ्यास करावा हे कळेल.

आपल्या स्वतःचा प्लॅन बनाव व अभ्यासाला लागा.









हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559


# कवितेच्या लाटावर...


































हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# शिक्षक दिन

ज्योतिर्मय साहित्य

५ सप्टेंबर म्हणजे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा स्मृतिदिन. हा दिवस आपल्या भारतात 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. ५ सप्टेंबर १८८८ रोजी डॉ. राधाकृष्णन यांचा जन्म झाला. डॉ. राधाकृष्णन हे एक शिक्षक होते तसेच ते भारताचे दुसरे राष्ट्रपती ही होते. त्यांचा स्मृतिदिन हा शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो.

आजच्या दिवशी शिक्षकांना पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला जातो. शिक्षकांचा सन्मान करण्याची ही परंपरा जुनी आहे.

शिक्षक म्हणजे –
शि म्हणजे शिल
क्ष म्हणजे क्षमा
क म्हणजे कला

ज्याच्याकडे शिल, क्षमा आणि कला याचा त्रिवेणी संगम आहे तो म्हणजे शिक्षक!

या दिवशी विद्यार्थी शिक्षकांप्रती कृतज्ञता म्हणून विविध कार्यक्रम आयोजित करतात. तसेच आपल्या संस्कृतीत आईनंतर दुसरं महत्त्वाचं स्थान असतं ते गुरूला. आपल्या जीवनाला दिशा देण्यात आणि आपली जडणघडण करण्यात गुरूचा वाटा खूप मोठा असतो. त्यामुळेच आपल्याकडे शिक्षक दिनाला विशेष महत्त्व आहे. व्यक्ती आणि समाजाच्या विकासात शिक्षणाचा वाटा मोलाचा आहे. जिथे शिक्षण आहे तिथेच विकास आहे, म्हणूनच शिक्षणातून व्यक्तीची जडणघडण करणाऱ्या शिक्षकाचा आदर करण्याचा हा दिवस असतो.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन विद्वतप्रचुर, व्यासंगी होते. त्यांना तब्बल २७ वेळा नोबेल पुरस्काराचे नामांकन मिळाले होते. १९५४ मध्ये त्यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

भारतात, शिक्षक दिन ५ सप्टेंबर रोजी समाज आणि राष्ट्रासाठी शिक्षकांच्या योगदानाला आदरांजली म्हणून साजरा केला जातो. ५ सप्टेंबर शिक्षक दिनी विद्यार्थी त्यांच्या शिक्षकांना शुभेच्छा, संदेश आणि भेटवस्तू पाठवून त्यांचा सन्मान करतात आणि त्यांना आदरांजली वाहतात.

शिक्षक दिनामागील कथेबद्दल बोलताना, असे म्हटले जाते की जेव्हा डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे काही मित्र आणि विद्यार्थी त्यांच्याकडे आले आणि त्यांनी



त्यांचा वाढदिवस साजरा करण्याची परवानगी देण्याची विनंती केली तेव्हा त्यांचे शब्द होते, माझा वाढदिवस वेगळा साजरा करण्याऐवजी, ५ सप्टेंबर हा शिक्षक दिन म्हणून साजरा केला तर तो माझा अभिमानाचा भाग असेल. आणि तेव्हापासून भारतात ५ सप्टेंबर हा शिक्षक दिन साजरा होऊ लागला.

१९६५ मध्ये, स्वर्गीय डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रमुख विद्यार्थ्यांनी त्यांना (महान प्रतिष्ठित शिक्षक) श्रद्धांजली वाहण्यासाठी एक मेळावा आयोजित केला होता. त्या मेळाव्यातच डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी त्यांच्या जयंती साजरी करण्याबाबत तीव्र आक्षेप व्यक्त केला. त्यांनी त्यांच्या देशातील सर्व महान शिक्षकांना भारत आणि बांगलादेश येथे आदरांजली वाहून त्यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी करण्याची इच्छा व्यक्त केली.

जगभरातील शिक्षणाच्या संख्येत वाढ झाल्यामुळे समाजात शिक्षण हा सर्वात उदात्त व्यवसाय मानला जातो. शिक्षक हेच शिक्षणाचा पर्याय निवडतात जेणेकरून ते ज्ञान आणि शहाणपणाचा प्रसार करू शकतील. असे मानले जाते, की शिक्षित लोकसंख्या देशाच्या विकासात मोठा वाटा उचलते. म्हणूनच, एखाद्या राष्ट्राला आर्थिकदृष्ट्या यशस्वी होण्यासाठी योग्य मार्गदर्शन आणि दृष्टिकोन असलेले सुशिक्षित नागरिक असणे आवश्यक आहे. शिक्षक केवळ विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमानुसार धडे शिकवत नाही तर मुलांना जबाबदार नागरिक बनवतो. शिक्षक हे अनेकांसाठी आदर्श आहेत आणि समाज त्यांचा




आदर करतो, त्यामुळे ते अधिक कौतुक आणि मान्यता मिळवण्यास पात्र आहेत. याच उद्देशाने भारतात शिक्षक दिन विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा आहे कारण हा दिवस त्यांना त्यांच्या शिक्षकांनी केलेले प्रयत्न समजून घेण्याची संधी देतो जेणेकरून त्यांना गुणात्मक शिक्षण मिळू शकेल. त्याचप्रमाणे, शिक्षक दिन शिक्षकांसाठी महत्त्वाचा आहे कारण या विशिष्ट दिवशी त्यांच्या प्रयत्नांना मान्यता दिली जाते आणि त्यांचे विद्यार्थी आणि प्रतिष्ठित संस्था त्यांचा सन्मान करतात.

विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांचे योगदान दुर्लक्षित करता येणार नाही. वर्षातून किमान एकदा तरी त्यांचा आदर आणि ओळख झाली पाहिजे. भारतात, दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी देशातील नागरिकांना शिक्षित करण्यात शिक्षकांच्या योगदानाचे कौतुक करण्यासाठी शिक्षक दिन साजरा केला जातो.

५ सप्टेंबर शिक्षक दिनी भारताचे राष्ट्रपती देशातील गुणवंत शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करतात. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा आणि माध्यमिक शाळांमध्ये शिकवणाऱ्या महान शिक्षकांबद्दल जनतेची कृतज्ञता म्हणून हा पुरस्कार प्रदान केला जातो. राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांचा मुख्य उद्देश देशातील सर्वोत्तम शिक्षकांच्या प्रचंड योगदानाचा गौरव करणे आणि अशा प्रकारे त्यांचा सन्मान करणे आहे. शिक्षक दिन हा शिक्षक आणि शिक्षकांमधील सुंदर आणि शुद्ध नाते साजरे करण्याचा एक अद्भुत प्रसंग मानला जातो. या दिवशी, शाळा, विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील विद्यार्थी त्यांच्या शिक्षकांसाठी मेळावे, विविध उपक्रम आणि खेळ आयोजित करतात जेणेकरून हा खास दिवस संस्मरणीय बनेल. शिक्षकांना आदर देण्यासाठी ते नृत्य, कविता वाचन, गाणी इत्यादी सादर करतात. विद्यार्थी त्यांच्या शिक्षकांना हाताने बनवलेले ग्रीटिंग कार्ड, भेटवस्तू आणि फुले देऊन त्यांचे आभार मानतात. शिक्षक दिनी ते त्यांच्या शिक्षकांना खास वाटावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतात. बऱ्याच शाळांमध्ये विद्यार्थी आपल्या आवडत्या शिक्षकाची भूमिका करून एखाद्या वर्गात शिकवतात. त्या दिवशी शिक्षकांना विश्रांती देतात. या दिवसाच्या बऱ्याच गमती जमती शिक्षक व विद्यार्थी यांच्या मनात कायम स्वरुपी असतात.

# जन्माष्टमी : गोकुळाच्या अंगणातून मनामनांत उतरलेला कृष्ण

ज्योतिर्मय साहित्य

भाद्रपदातील कृष्ण पक्षाची अष्टमी आली की भारतीय संस्कृतीच्या आकाशात जणू बासरीचा स्वर घुमू लागतो. मंदिरे सजतात, घराघरांत पाळणे सजतात, अंगणात रांगोळ्या उमटतात आणि मध्यरात्रीच्या पवित्र क्षणाची भक्तिभावाने प्रतीक्षा सुरू होते. ४ सप्टेंबर २०२६ रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमी साजरी होत आहे. या दिवशी उपवास, पूजा, अभिषेक, भजन-कीर्तन आणि मध्यरात्री जन्मसोहळ्याने श्रीकृष्णाचा जन्मोत्सव साजरा केला जातो.



कृष्णाचा जन्म कारागृहात झाला; मात्र त्याच्या जन्माची पहाट गोकुळाच्या आनंदात फुलली. ही कथा भारतीय मनाला हजारो वर्षांपासून सांगते की अंधार कितीही गडद असला तरी प्रकाशाची शक्यता कधीच संपत नाही. त्यामुळे जन्माष्टमी हा केवळ देवतेचा जन्मोत्सव नसून अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा, धर्माची पुनर्स्थापना करण्याचा आणि जीवनातील आशा जिवंत ठेवण्याचा उत्सव आहे. मध्यरात्री शंखनाद, घंटानाद आणि 'नंद के आनंद भयो'च्या जयघोषात बालकृष्णाला पाळण्यात झुलवताना भक्तिभावाने वातावरण भारावून जाते.

श्रीकृष्णाचे व्यक्तिमत्त्व हे विरोधाभासांचा अद्भुत संगम आहे. तो देवकीचा पुत्र आणि यशोदेचा कान्हा आहे; गोकुळातील लोणी चोरणारा नटखट बालक आहे, तर कुरुक्षेत्रावर अर्जुनाला जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारा योगेश्वरही आहे. त्याच्या बाललीलांमध्ये वात्सल्य, राधाकृष्णाच्या प्रेमात समर्पण, सुदाम्याच्या मैत्रीत निःस्वार्थता आणि भगवद्गीतेत कर्मयोगाचा संदेश आहे.

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' हा कृष्णाचा संदेश आजही तितकाच मार्गदर्शक आहे. कर्म करावे,

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार,बीड**

मात्र फळाच्या मोहापायी कर्तव्य विसरू नये, ही शिकवण प्रत्येकाच्या जीवनाला दिशा देते. कृष्णाच्या हातातील सुदर्शन चक्र अन्यायाविरुद्धच्या सामर्थ्याचे प्रतीक आहे, तर बासरी प्रेम आणि करुणेची भाषा बोलते. म्हणून कृष्णभक्ती म्हणजे केवळ मंदिरात पूजा करणे नव्हे, तर आपल्या कर्मात प्रामाणिकपणा आणि आचरणात सद्भावना आणणे होय.

जन्माष्टमीच्या रात्री घरातील देवघर स्वच्छ करून श्रीकृष्णाला स्नान घालून नवीन वस्त्रे व अलंकार परिधान केले जातात. मोरपिसांचा मुकुट, फुलांची आरास, पंचामृत अभिषेक, तुलशीदल, माखन-मिश्रीचा नैवेद्य आणि पाळणा यांना विशेष महत्त्व असते. मध्यरात्री जन्मसोहळ्यानंतर आरती, भजन आणि प्रसादाचे आयोजन केले जाते. मात्र या सर्वांपेक्षा महत्त्वाची असते ती भक्तीची भावना. देवाला महागडा नैवेद्य नव्हे, तर प्रेमाने अर्पण केलेला साधा घासही प्रिय असतो.

मथुरा, वृंदावन, गोकुळ आणि द्वारका ही कृष्णभक्तीची प्रमुख केंद्रे आहेत. जन्माष्टमीच्या निमित्ताने या ठिकाणी मोठ्या उत्साहात धार्मिक कार्यक्रम होतात. महाराष्ट्रातही विविध मंदिरे, मठ आणि इस्कॉन केंद्रांमध्ये जन्माष्टमी साजरी केली जाते. दहीहंडीच्या माध्यमातून कृष्णाच्या बाललीलेचे आधुनिक रूप पाहायला मिळते. मात्र उत्सवाच्या आनंदासोबत सुरक्षितता, शिस्त आणि सामाजिक संवेदनशीलता जपणेही आवश्यक आहे.

श्रीकृष्णाचा संदेश आजच्या काळात अधिक व्यापकपणे समजून घेण्याची गरज आहे. समाजात अन्याय दिसला तर त्याविरुद्ध आवाज उठवणे, दुर्बलांना आधार देणे, सत्याची बाजू घेणे, लोभापेक्षा कर्तव्याला महत्त्व देणे आणि द्वेषाऐवजी संवादाचा मार्ग स्वीकारणे, हीच आधुनिक कृष्णभक्ती ठरू शकते. शेतकरी, विद्यार्थी, कामगार आणि गरजू व्यक्तींच्या अडचणी समजून घेऊन त्यांना मदतीचा हात देणे, हीदेखील कृष्णसेवाच आहे.

जन्माष्टमीच्या मध्यरात्री पाळणा हलतो, शंखनाद होतो आणि बालकृष्णाच्या मूर्तीसमोर उभे राहिल्यावर मनातील धावपळ क्षणभर शांत होते. त्या क्षणी देव बाहेर नसून आपल्या अंतःकरणात असल्याची अनुभूती येते. यशोदेच्या अंगणात धावणारा कान्हा, राधेच्या मनात उमटणारा प्रेमाचा स्वर, गाईंच्या कळपामागे जाणारा गोपाळ आणि कुरुक्षेत्रावर कर्मयोग सांगणारा योगेश्वरहे सारे कृष्णाचेच रूप आहे.

म्हणून या जन्माष्टमीला आपल्या मनातील अहंकार, द्वेष, लोभ आणि असत्यरूपी कंसाचा पराभव करण्याचा संकल्प करूया. प्रत्येक घरात आनंद नांदो, शेतकऱ्याच्या शिवारात हिरवाई फ ुलो, विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत ज्ञानाची ज्योत तेवो आणि समाजाच्या मनात प्रेमाची बासरी अखंड वाजत राहो.

'नंद के घर आनंद भयो, जय कन्हैया लाल की!'

हे कृष्णा, आमच्या कर्माला दिशा दे, मनाला शांतता दे आणि समाजाला सद्भावनेची वाट दाखव.

# राष्ट्रवैभव : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

ज्योतिर्मय साहित्य





कोणत्याही राष्ट्राचे वैभव त्या राष्ट्राच्या उत्कृष्ट, ज्ञान-सम्पन्न,गुणवंत व उच्च विद्याविभूषित शिक्षकांच्या कार्य कर्तृत्ववार अवलंबून असते.ज्या राष्ट्राचे शिक्षक उच्च विद्याविभूषित कर्मयोगी, ज्ञानयोगी त्या राष्ट्राचे विद्यार्थीही सर्वच क्षेत्रात उत्कृष्ट प्रगती व विकास करून देशालाही वैभव संपन्न बनवितात. आणि म्हणून उत्कृष्ट शिक्षकांना राष्ट्राचे वैभव म्हणतात.अशा वैभव सम्पन्न शिक्षकात सर्वात वर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे नाव आहे. डॉ.राधाकृष्णन म्हणजे भारताचे थोर वैभव होय.पूर्व -पश्चिम चा अपूर्व संगम घडविणारे तसेच धर्म व विज्ञान याचा नवा अर्थ त्यांनी जगाला सांगितला. भारतीय संस्कृतीचा सखोल अभ्यास करून तिची महत्ती साऱ्या जगाला पटवून दिली, अशा या ऋषीतुल्य विभूतीने राष्ट्रपती पदावरून

भारतीय जनतेला आदर्श नेतृत्व ही दिले.५सप्टेंबर,

रोजी त्यांचा जन्म दिन असतो हा दिन शिक्षक दिन म्हणून साजरा करतात,वर्ष १९५१ ला भारताचे उपराष्ट्रपती म्हणून त्यांची बिनविरोध निवड झाली.

या पदावर १० वर्ष त्यांनी सेवा दिली.१३मे, १९६२ रोजी भारताचे दुसरे राष्ट्रपती म्हणून त्यांची निवड झाली.''




शिक्षक, लेखक, विचारवंत अशा विविध नात्यांनी ते विश्व विख्यात होते. शिक्षण व्यक्ती जीवनाच्या उन्नती व विकासाचे प्रभावी साधन आहे,हे जाणून त्यांनी देशात अनेक शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देऊन शिक्षण तळा गाळातल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविले. ते ऑक्सफोर्ड विद्यापीठात विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून गाजले.अशा या महान तत्वज्ञानी

शिक्षक राष्ट्रपती असलेल्या डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्यकर्तृत्वाला कोटी! कोटी!!प्रणाम.

# दिव्यांग भगिनींसोबत जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी साजरे केले रक्षाबंधन

ज्योतिर्मय साहित्य

**जळगाव / गोकुळसिंग राजपूत**– पहूर ता जामनेर सुप्रीम इंडस्ट्रीज, गाडेगाव येथे स्वयं दीप परिवार, चाळीसगावच्या माध्यमातून दिव्यांग भगिनींसोबत रक्षाबंधनाचा स्नेहपूर्ण सोहळा उत्साहात पार पडला. सुप्रीम फ्रेंड्स ग्रुपच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमास जिल्हाधिकारी रोहन घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी स्वयं दीप परिवाराच्या अध्यक्षा मीनाक्षीताई निकम यांनी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले. दिव्यांग भगिनींच्या पाठीशी भाऊ म्हणून सदैव खंबीरपणे उभे राहण्याच्या त्यांच्या भावनेबद्दल मीनाक्षीताईंनी जिल्हाधिकाऱ्यांचे विशेष आभार मानले.

स्वयं दीप परिवारातील दिव्यांग भगिनींसाठी निवासी प्रकल्पाकरिता घर खरेदी करून दिल्याबद्दल सुप्रीम इंडस्ट्रीजचे सुरेश मंत्री व ज्ञानदेव महाडिक यांचे मीनाक्षीताईंनी विशेष आभार मानले. तसेच आरोग्यदूत पितांबर भावसार यांनी दिलेल्या अनमोल सहकार्याबद्दलही त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाला अनिल भोकरे, राजेंद्र ठोंबरे, आर. डी. पाटील, विपुल पारीख, जी. के. रमेश, संजय पाटील, धनंजय जेहूरकर, एन. एम. पाटील, व्ही. एस. पाटील, सुगन मुनोत, पितांबर भावसार, अतुल लड्डा, अमोल शूर, यश खिवसरा यांच्यासह सुप्रीम फ्रेंड्स ग्रुपचे पदाधिकारी व सहकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत बियाणी यांनी केले, तर आभार प्रदर्शन राजेंद्र ठोंबरे यांनी केले. सुप्रीम फ्रेंड्स ग्रुपच्या सर्व सहकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. रक्षाबंधनाच्या निमित्ताने दिव्यांग भगिनी आणि जिल्हाधिकारी यांच्यातील हा स्नेहबंध उपस्थितांच्या मनाला भावणारा ठरला.

# प्रा. शैलजा देशपांडे यांचे श्रीकृष्ण व खाटुशाम'' याविषयावर व्याख्यान

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – प्रगतिशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थे तर्फे श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त प्रा. शैलजा देशपांडे यांचे गुरवार ३ सप्टेंबर रोजी ''श्रीकृष्ण व खाटुशाम'' याविषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी खाटूशाम विषयी सविस्तर माहिती सांगितली.

बर्बरिक हा पांडू पुत्र भीमाचा नातू आणि घटोत्कचचा पुत्र. बर्बरिकाला भगवान शंकराकडून तीन बाणांचे वरदान मिळाले आणि त्याने फक्त दुर्बलांना साहाय्य करावे असा आशीर्वाद दिला होता.

हे गुपित ओळखून श्रीकृष्णाने ब्राह्मण स्वरूपात येऊन त्याची परीक्षा घेतली आणि नंतर कृष्ण रूपात प्रकट झाले.

कृष्णाने त्याची परीक्षा घेतली व गुरुदक्षिणा म्हणून बर्बरिकाला शिर मागितले. बर्बरिकने स्वतःच्या हाताने शिर दिले आणि इच्छा व्यक्त केली की मला कौरव पांडवांचे संपूर्ण युद्ध पाहायचे आहे. कृष्णाने त्याच्या शिरावर अमृत शिंपडून जिवंत केले. श्रीकृष्णाने बर्बरिकचे शिर पर्वतावर ठेवले. त्याने कौरव पांडवांचे १८ दिवसांचे युद्ध पाहिले.




त्यानंतर कृष्णाने ते शिर रूपवती नदीमध्ये अर्पण केले आणि त्यास वरदान दिले की, तू महात्मा म्हणून माझ्या 'श्याम' या नावाने ओळखला जाशील. तुझ्या दरबारात जो भक्त येईल तो रिकाम्या हाताने जाणार नाही. शिर वाहत राजस्थान मधील खाटू गावात गेले तेथील राजा रूपसिंग चौहान याच्या स्वप्नात जाऊन श्रीकृष्णाने सांगितले की, या शिरामध्ये माझा वास आहे. तू त्याचे मंदिर स्थापन कर. म्हणून बर्बरिक हा खाटू श्याम या नावाने ओळखला जातो आणि त्याचे पूजन केले जाते.

व्याख्यानानंतर दहीहंडी चा कार्यक्रम झाला. अध्यक्ष प्रमोद बेंडे, सचिव कमलाकर पाठक, उपाध्यक्ष वंदना देशमुख, गीतांगण प्रमुख निर्मला सांबरे, संचालिका स्मिता वेद, शिक्षिका भावना दाणेकर आणि गीतांगण चे बाल गोपाळ यांनी दहीहंडी फोडली. सर्वांना काल्याचा प्रसाद वाटण्यात आला.

कार्यक्रमास माजी अध्यक्ष, कार्यकारिणी सदस्य व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शैला मोहनपूरकर यांनी केले.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# हरितालिका पूजन : हरितालिका पूजन- सांस्कृतिक, सामाजिक,नैसर्गीक परंपरा जतन करण्याचा उत्सव

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतीय संस्कृतीत प्रत्येक सण,समारंभ , उत्सवामागे श्रद्धा, परंपरा आणि जीवनमूल्यांचा सुंदर संगम दिसून येतो. प्रत्येक सण काहीतरी नवीन वैशिष्ट्यघेऊन येतो,आणि शिकवण देतो.

भाद्रपद महिन्यातील शुद्ध तृतीयेच्या दिवशी साजरा होणारा हरितालिका पूजनाचा सण हा विशेषतः महिलांसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि श्रद्धेचा दिवस मानला जातो. या सणातून नारीशक्तीचे दर्शन घडते. स्त्रीयांना त्यांच्यातील असामान्य शक्तीची जाणीव व्हावी, हाच हरितालिका सणामागील मूळ उद्देश असावा.

हरितालिका' याचा अर्थ म्हणजे 'हरित' म्हणजे हरण करून नेणे आणि 'आलिका' म्हणजे सखी. पार्वतींच्या सखीने त्यांना घरातून दूर जंगलात नेले, म्हणून या व्रताला हरितालिका असे म्हटले जाते.

हा सण भगवान शंकर आणि पार्वती यांच्या आठवणीत साजरा केला जातो. मनोभावे केलेली पूजा, उपवास, व्रत आणि प्रार्थना यांमधून स्त्रिया आपल्या कुटुंबाच्या सुख-समृद्धीची, पतीच्या दीर्घायुष्याची तसेच लग्न नं झालेल्या, कुमारीका मुली मनासारखा, शंकरासारखा भोळा सांब म्हणजेच साधा,सरळमार्गी नवरा मिळावा यासाठी प्रार्थना करतात.

हरितालिकेच्या दिवशी घरात उत्साहाचे आणि मंगलमय वातावरण असते. दाराला तोरण बांधुन घराची स्वच्छता करून दारात सुंदर रंगीत रांगोळी काढली जाते. पूजेची तयारी केली जाते. पूजा करण्यासाठी एक सुंदर जागा सजविली जाते. फुले, पाने, फळे आणि विविध पूजेच्या साहित्याने पूजेची मांडणी केली जाते. पाट किंवा चौरंग मांडून त्यावर हरितालिकेची बेलपत्र, दूर्वा, फुले, फळे, नारळ, हळद, कुंकू, अक्षता आणि विविध नैवेद्य अर्पण करून भक्तिभावाने पूजा केली जाते. श्रद्धेने पूजा करून देवाला संसारातील सुख,समाधान, प्रेम आणि परस्पर विश्वास टिकून राहावा, अशी प्रार्थना केली जाते. अविवाहित मुली चांगलाआणि समजूतदार जीवनसाथी मिळावा,अशी मनोकामना करतात. दिवसभर ज्याला जमेल तसा उपवास करतात. हरितालिकेच्या रात्री जागरणालाही विशेष महत्त्व आहे.

मुलींना अगदी लहान वयापासूनच नातेवाईक,औषधी वनस्पती, निसर्गाची ओळख हसत खेळत व्हावी, त्यांचे जतन व्हावे,मनोरंजन व्हावे, एकीची भावना त्यांच्या मनात रुजावी आणि त्याच बरोबर आपल्या हिंदू धर्मातील देव,धर्माची माहिती व्हावी हाच मुख्य उद्देश होता हरितालिका पुजा साजरी करण्यामागचा!


त्यानिमित्ताने महिलांना एकत्र येण्याची, संवाद साधण्याची आणि आपले सुख-दुःख वाटून घेण्याची संधी मिळायची



पूर्वी मोठ्या वाड्यांमध्ये किंवा घराच्या अंगणात एकत्र पूजा , जागरण, खेळ, हरितालिकेची कथा एकत्र ऐकणे, यामुळे खूप मजा येत असे.

हरितालिकेची कथा आम्ही अगदी लहानपणापासुन दरवर्षी ऐकतो, आता तर तोंडपाठ पण झाली आहे, तरीही दरवेळी ऐकताना ती तितकीच छान वाटते. ती थोडक्यात अशी,शंकर खूप साधा, भोळा असल्यामुळे पार्वतीचे त्याच्यावर मनापासून प्रेम होते. पण ती हिमालंय राजाची श्रीमंत कन्या! त्यामुळे वडिलांना हे मान्य नव्हते. ती उपवर झाली आणि त्यांनी तिच्यासाठी वर संशोधन सुरु केले. त्यामुळे पार्वतीला राग आला,वाईट वाटले.

ती शंकराला प्रसन्न करण्यासाठी वनात निघून गेली. शंकराची पूजा करून, उपवास करून तिने कठोर तपश्चर्या केली आणि महादेवाला प्रसन्न करून त्यांच्याशी विवाह करण्याची इच्छा सांगितली. पार्वतीच्या निस्सीम श्रद्धेने आणि अखंड भक्तीने प्रसन्न होऊन भगवान शंकरांनी तिला पत्नी म्हणून स्वीकारण्याचे वचन दिले.मग त्यांचा विवाह झाला. त्यावेळी नदीकाठी हे व्रत वाळूची मूर्ती बनवून केली. तिच्या सोबत तिच्या दोन सख्याही होत्या अशी ही कथा आहे, म्हणून आताही वाळूचा महादेव, पार्वती, नंदी, तिच्या सख्या, नदी बनवून त्यांची पूजा केली जाते. म्हणुनच हा सण दृढ निश्चय, श्रद्धा आणि इच्छाशक्तीचे प्रतीक मानला जातो.



सौ हेमा मुश्रीफ, पुणे

मात्र काळ बदलला आणि या पूजेचे स्वरूपही बदलू लागले. आता मुलींना शिक्षण,करिअर,नोकरी यातून इतका वेळ या पूजेसाठी देणे शक्य होत नाही.आज मात्र शहरांतील धावपळ, लहान कुटुंबे, नोकरी-व्यवसाय आणि बदललेली जीवनशैली यामुळे प्रत्येक घरात जमेल तशी पूजा करतात. झेपेल तसा उपवास करतात.शेवटी श्रद्धा, मनाची पवित्रता, शुद्ध आचरण हेच महत्वाचे असते.या कथेतील पार्वतीची जिद्द,चिकाटी,श्रद्धा आणि विश्वास यामुळे तिने प्रत्यक्ष महादेवांना जिंकून तिला हवे ते मिळवले.


त्यातून स्त्रीमध्ये किती शक्ती आहे हे लक्षात येते आणि त्या शक्ती ओळखून आता स्त्रीयांना वागण्याचा बोधच या कथेतून मिळतो असे मला वाटते. कारण स्त्री जेव्हा दुसऱ्या स्त्रीचा हात धरते, तेव्हा केवळ एक व्यक्ती मजबूत होत नाही, तर संपूर्ण समाज अधिक सशक्त होतो. आता स्त्री प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करीत आहे. उंच भराऱ्या मारत पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात कार्यरत आहे. तरीही तिच्या मनात संस्कारांची ओढ आहे, परंपरेबद्दल आदर आहे आणि कुटुंबाबद्दल प्रेम आहे. आजच्या दररोजच्या त्याच त्या धकाधकीच्या ताणतणावातुन हे असे छोटे छोटे सण आपल्या संस्कृतीची आठवण ठेवायला, कामातील व्यापात नवीन बदल मिळाल्यामुळे उत्साह, त्यानिमित्ताने एकत्र भेटणे अशा गोष्टीतून खूप मोठा आनंदच देतात. कुटुंबासोबत मोबाईल, डिजिटल गोष्टी बाजूला सारून काही क्षण का होईना आनंदाने एकत्र घालवतात. नकळतपणे हा संस्काराचा वारसा पुढे नेला जातो. हे आपल्या हिंदू संस्कृतीसाठी खूप मोलाचे आहे. सणाचा खरा आनंद हा भक्ती, आनंद, प्रेम आणि एकोप्यातच असतो,हो ना?

हरितालिका पूजनात पाने, फुले, फळे, माती आणि इतर नैसर्गिक वस्तूंचा वापर केला जातो. त्यामुळे निसर्गाचे रक्षण करण्याची सुद्धा आपलीच जबाबदारी आहे, हे यातून लक्षात येते. पर्यावरणाचे रक्षण करण्याची जबाबदारीही ओळखून प्रत्येकानी प्लास्टिकच्या, पर्यावरणाचा आणि आपल्याही आरोग्यासाठी ऱ्हास करणाऱ्या गोष्टींचा वापर सजावटीसाठी करण्यापेक्षा फुले, पाने आणि पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंचा वापर केल्यास, पर्यावरणपूरक गोष्टीचा वापर केला, आपल्या सणाची पवित्रता आणि निसर्गप्रेम दोन्ही जपले जाईल. म्हणुनच या पवित्र दिवशी आपण केवळ आपल्या कुटुंबाच्या सुखाची प्रार्थना न करता समाजात प्रेम, आपुलकी, समता वाढावी, अशीही प्रार्थना करूया आणि हरितालिका सणाचा आनंद घेऊया.

# बाई हरत नसते: कौटुंबिक संघर्षाचा चित्तरपट

**ज्योतिर्मय साहित्य**

स्त्रीयांवर होणारे अन्याय अत्याचार, छळवणूक, फसवणूक, मारहाण हे भूत काळात होतच होते, वर्तमानात त्याचे स्वरूप बदलले,एवढेच. काळ कोणताही असो-बाईने न हार मानता प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढला आहे.तो कसा यांचे वस्तूनिष्ठ वर्णण ऐश्वर्य पाटेकर यांच्या ''बाई हरत नसते''या कादंबरीत फार प्रभावी आलेले आहे.




पेन प्रकाशनाने जुलै २०२६ मध्ये ही कादंबरी प्रकाशित केली आहे,ज्याची छान चर्चा सुरू आहे.ज्यांनी ही कादंबरी वाचली आहे,ते समाज माध्यवावर प्रतिक्रियांमधून व्यक्त होत आहेत.

उलगडत निघालोय
आमच्या जगण्याचा चित्तरपट
आठवणींचा पदर धरून
आठवणींच्या वारुळांचं
खोदकाम मी करतोय, असे म्हणून लेखक कादंबरीची सुरूवात करतात.

सिनेमा मालिकात जसे दोन-तीन खलनायक असतात तसे या कांदबरीतही भेटतात.लेखकाची आजी, वडील,आत्या यांची सतत कुरघोडी, मारहाण, फसवणुक,वाद विवाद, भांडखोर प्रवृत्ती या पात्रात आहे.हे एका बाजूला.तर दुस-या बाजूला लेखकाची आई,त्याच्या चार बहिणी,आजोळ परिवारातील मामा,आजोबा ही मंडळी. लेखकाच्या व्यसनी बापाचे दुसरे लग्न,या प्रकारात बाहेर काढली जाते ती लेखकाची आई, बहिण,भाऊ..

ही कथा आई(इंदू)माई,अक्का,तावडी पमी यांची जशी आहे,तशीच ती संतु,झिंज्या,पक्या,गण्या,दिवड्या, आणि लेखकातील भावड्या यांचीही आहे. पाटेगाव/मानोरी परिसरात ही कथा घडते

यातील सर्वात शेवटचे ज्यू नावाचे प्रकरण आहे,त्यात या कादंबरीचा काव्यमय समारोप लेखकाने केला आहे.लेखक दहावी पास होतो,त्यांचा आनंद आई,व चारही बहिणीस होतो.शाळा शिकत असतानाच्या काळात लेखकाला कवीची ओळख मिळते,शाळेत ज्याचं जाहिर कौतुक संस्थेचे अध्यक्ष रामराव करतात,या सर्व कवितांचे पुस्तक करू,असे आश्वासन देतात.

...ते एकटं एक ज्यू होतं?हजार ज्यु होते
आमच्या खांद्यावर
आजीनं अतोनात केलेल्या छळाचं ज्यू
बाप असुनही बिनबापाचं म्हणत हिणवणारं ज्यू
बापानं बळजबरी लादलेले वनवासांचं ज्यू
चुलत्या-काक्यांनी केलेल्या कारस्थानाचं ज्यू
जगणं मुश्कील करून सोडणारं ज्यू
अवघड परिस्थितीच्या जुलमाचं ज्यू

ही दीर्घ कविता बरीच मोठी आहे

'' कुठलं ज्यू उतरवून ठेवायचं,अनं कुठला भार सहन करायचा,यांची निवड करणं त्या वेळेला नियतीने आमच्या हातात निर्णय ठेवला नाही,पण आज तो निर्णय माझ्या हातात आहे,तोच करील आता आमच्या ह्या ज्यूच्या दास्यातून मुक्तता.''असे लेखक म्हणतो.

प्रत्येकाने जरूर वाचावी,अशीही '' बाई हरत नसते'',ही कादंबरी आहे.

लेखक युवा साहित्य अकादमी पुरस्काराचे पहिले विजेते लेखक आहेत.भुईशास्त्र,कासरा हे दोन कविता संग्रह,आणि बाभूळकांड हा कथा संग्रह या पूर्वी प्रकाशित झाले आहेत.आणि आता ही नवीन कादंबरी वाचकांसाठी उपलब्ध झाली आहे.पुस्तकाला ज्येष्ठ ग्रामीण लेखक डॉ.द.ता.भोसले यांचे ब्लर्ब लाभले असुन त्यांनी पुस्तकाचे झुंज या एकाच शब्दात वर्णन केले आहे,यात पुस्तकाचा सर्व सार एकवटला आहे.

अपूर्वा जोशी,पुणे

बाई हरत नसते- लेखक ऐश्वर्य पाटेकर
पृष्ठ ३२६/मूल्य ४५० रूपये.
आठवी आवृत्ती, पेन प्रकाशन, पुणे.

# एमआयटी पॉलीटेक्निकमध्ये उत्साहात शिक्षक दिन साजरा





**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - महान शिक्षक, तत्त्वज्ञ, विचारवंत, समाजसेवक व ज्येष्ठ राजकीय नेते भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त एमआयटी पॉलीटेक्निकच्या संगणक अभियांत्रिकी विभागातील द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांतर्फे शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी संगणक अभियांत्रिकी विभागातील वरिष्ठ प्राध्यापक प्रा. सुचेता दाभाडे व प्रा. राखी दीक्षित यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी द्वितीय व तृतीय वर्षाच्या वर्गांमध्ये विद्यार्थी-शिक्षक म्हणून अध्यापनाचा अनुभव घेतला. विद्यार्थ्यांनी अत्यंत आत्मविश्वासाने व उत्साहाने घेतलेली व्याख्याने त्यांच्या मेहनतीचे, अभ्यासाचे आणि शिक्षक या पवित्र व्यवसायाविषयी असलेल्या आदराचे प्रतीक ठरली.


यावेळी विद्यार्थ्यांनी प्राचार्य डॉ. एस. जी. देशमुख, संगणक अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. ए. एस. नागरिक तसेच विभागातील सर्व प्राध्यापकांचे कृतज्ञता व आदर व्यक्त करून सत्कार केला.


कार्यक्रमात प्राध्यापकांसाठी विविध मनोरंजक खेळ व आनंददायी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला. त्यामुळे शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील स्नेहबंध अधिक दृढ झाले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ वाय ए कवडे, एम आय टी चे महासंचालक प्रा मुनिश शर्मा प्राचार्य डॉ सुनिल देशमुख यांनी शिक्षक दिनानिमित्त सर्व प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तृतीय व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन स्टाफ को-ऑर्डिनेटर प्रा. सचिन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

शिक्षकांविषयी कृतज्ञता, आदर आणि प्रेम व्यक्त करणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी तसेच प्राध्यापकांसाठी संस्मरणीय ठरला.




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559